**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

जा.क्र.अम / सका - ०४/ २०१६.
महानगरपालिका सचिव कार्यालय.
दिनांक : १० / ११ /२०१६.

अहमदनगर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेची सुचना

( महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण - २ नियम क्र.१ (अ) अन्वये )

**सभा सुचना क्रमांक ०४, शनिवार दिनांक १९ / ११ /२०१६.**

प्रति,
मा.श्री. / श्रीमती............................................

सदस्य,
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

महोदय,

यांस.-

याद्वारे कळविण्यांत येते की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण २ नियम क्र. १ ( अ ) अन्वये मा.महापौर यांनी दिनांक १९/१०/२०१६ रोजी झालेल्या सभेमधील तहकुब विषयासाठी अहमदनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा **शनिवार दिनांक १९/११/२०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता नविन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील महानगरपालिका सभागृहात** सोबतच्या विषय पत्रिकेतील कामकाज चालविण्यांसाठी आयोजित केली आहे.

आपणांस सभेस उपस्थित राहण्यांची विनंती करण्यांत येत आहे.

**सोबत :** १. विषय पत्रिका
२. प्रस्तावाची टिप्पणी

प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

सभा क्रमांक - ४

दिनांक १९/१०/२०१६ रोजी झालेल्या सभेमधील तहकुब विषयासाठी **शनिवार दिनांक १९/११/२०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता** महानगरपालिका सभागृह, नविन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड, अहमदनगर येथे होणा-या सर्वसाधारण सभेची **विषय पत्रिका.**

| विषय क्र. | विषय |
|---|---|
| १६ | दुखवटयाचे प्रस्ताव |
| १७ | अहमदनगर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेमध्ये **"मुलामुलींचे गुणोत्तर प्रमाणाची माहिती देणे ".** |
| १८ | अहमदनगर महानगरपालिकेच्या प्रत्येक महिन्याच्या सर्वसाधारण सभेमध्ये स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत या योजने बाबत अंमलबजावणीची माहिती देणे. |
| १९ | अहमदनगर महानगरपालिकेतील कर्मचा-यांच्या रुपये एक लाखापेक्षा जास्त वैद्यकीय खर्चाच्या प्रतीपुर्ती देयकाबाबत.. (१) श्री.किशोर दत्तात्रेय कानडे, लिपीक, (२) श्री.खेमनर पाटीलबा रावजी, इलेक्ट्रीक लिपीक (३) श्री.संजीव किसन चव्हाण, मेहेतर कामगार यांचे वैद्यकीय प्रतीपुर्ती बाबत |
| २० | शासकीय कर्मचा-यांच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीच्या मंजुरीबाबत प्रतिपूर्तीच्या अनुज्ञेयतेची कमाल मर्यादा व मंजुरीच्या अधिकारांबाबत सुधारणा.. संदर्भ - मा.शासन सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्रमांक वैखप्र २०१६/प्र.क्र.१६/२०१६/राकावि-२ दिनांक १६ मार्च २०१६. |
| २१ | अहमदनगर महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक ८ मधील नंदनवन कॉलनी येथील ओपन स्पेसला छत्रपती शिवाजी महाराज उद्यान असे नामकरण करणे बाबत मा.नगरसेविका सौ.उषा शिवाजीराव नलवडे यांचे दि.३०/०८/२०१६ चे पत्र. |
| २२ | १४ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार अहमदनगर महानगरपालिकेस प्राप्त झालेल्या अनुदानामधून रक्कम रु.२५२.६१ लक्ष एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम अंतर्गत फेज-१, फेज-२ व डॉ.बाबासाहेब आंबेडकर श्रम साफल्य आवास योजना महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान जिल्हास्तर (रस्ते विकास) व महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान जिल्हास्तर (पाणी पुरवठा योजना) योजनेच्या मनपा हिश्यापोटी वर्ग करणे बाबत.<br>संदर्भ :- मा.शासन निर्णय क्रमांक ८०१५/प्र.क्र.१०६/नवि-४ दिनांक ०३/०८/२०१५. |
| २३ | मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज. |

मा.महापौर सो, यांचे मान्यतेने.
दिनांक : १० / ११ /२०१६.

प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक :-१६** **दिनांक : १९ / ११ /२०१६.**

---

**प्रस्तावाचा विषय :-** दुखवटयाचे प्रस्ताव

| अ.क्र. | विषय |
|---|---|
| १ | चित्रपट सृष्टीतील अभिनेत्री अश्विनी एकबोटे यांचे रविवार दि.२३/१०/२०१६ रोजी पुणे येथे झालेल्या दुःखद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| २ | महाराष्ट्राचे प्रबोधन करणारे जेष्ठ विचारवंत वसंत पळशीकर यांचे शनिवार दि.२९-१०-२०१६ रोजी नाशिक येथे झालेल्या दुःखद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ३ | नगर शहरातील सौ.सुहासिनी वसंतराव पवार यांचे गुरूवार दि.३/११/२०१६ रोजीी नगर येथे झालेल्या दुःखद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ४ | भारतीय जनता पक्षाच्या ज्येष्ठ नेत्या व माजी केंद्रीय मंत्री जयवंतीबेन मेहता यांचे रविवार दि.७-११-२०१६ रोजी मुंबई येथे झालेल्या दुःखद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ५ | नगर तालुक्यातील सामाजिक कार्यकर्ते जनार्धन संभुजी टापरे महाराष्ट्राचे प्रबोधन करणारे जेष्ठ विचारवंत वसंत पळशीकर यांचे सोमवार दि.७-११-२०१६ रोजी नगर येथे झालेल्या दुःखद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ६ | नगर शहरातील श्री योगेश बजाज यांचे सोमवार दि.७-११-२०१ रोजी पुणे येथे झालेल्या दुःखद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ७ | दर्शन सेल्स मधील मुकेश जैन यांच्या मातोश्री सौ.प्रभावती जैन यांचे दि.१३/११/२०१६ नगर येथे झालेल्या दुःखद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |

---*---

**चर्चा :-**

**मा.श्री.संजय शेंडगे :-** दुखवटयाचे प्रस्ताव घ्या.

**मा.श्री.कैलास गिरवले :-** बँकांच्या लाईनमध्ये मृत्यू पावलेल्या ३९ व्यक्तींना श्रध्दांजली वाहण्यात यावी.

---*---

**ठराव :-**

दोन मिनीटे स्तब्ध उभे राहुन श्रध्दांजली वाहण्यात आली.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक : १७** **दिनांक : १९ / ११ /२०१६.**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेमध्ये **"मुलामुलींचे गुणोत्तर प्रमाणाची माहिती देणे ".**

**---*---**

**प्रस्तावाचा मजकुर :-**

उपरोक्त विषयान्वये टिपणणी सादर करण्यात येते की, मा.शासनाच्या मार्गदर्शनानुसार सादर केलेल्या प्रस्तावानुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या मा.सर्वसाधारण सभेच्या विषयपत्रिकेवर कायम स्वरुपी घेण्यात आलेले आहे. त्याकामी दिनांक ३१/१२/२०१५ अखेरची अद्ययावत माहिती मा.महासभेपुढे ठेवणे बाबत मा.महापौर यांनी आदेशीत केलेले आहे.

तरी महानगरपालिका कार्यक्षेत्रामधील जन्म झालेल्या मुला-मुलींचे गुणोत्तर प्रमाणाची माहिती दिनांक ३१/१२/२०१५ अखेरची अद्ययावत माहिती मा.महासभेपुढे सविनय सादर.

सोबत :- माहितीचे तक्ते.

---*---

**चर्चा :-**

**मा.श्री.अनिल शिंदे :-** या सभागृहाचे सन्माननीय सदस्य यांना बोलण्याची संधी द्यावी.

**मा.श्री.संजय घुले :-** दिनांक १९/१०/२०१६ रोजीची मागील सभा का रद्द झाली ते परिपत्रक वाचुन दाखवा गेल्या वेळेस आचारसंहिता लागली होती त्यामुळे २ विषय घेतले व धोरणात्मक विषय स्थगीत ठेवण्यात आले. आजच्या सभेत विषय क्रमांक २०,२१,२२ स्थगीत ठेवायचे आहेत.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** आयुक्त साहेब काय परिपत्रक आहे ते वाचुन दाखवा.

**मा.श्री.दिप चव्हाण** :- महापौर साहेब मागची सभा तहकूब का विषय तहकुब.

**मा.महापौर साहेब** :- दुखवटयाचा प्रस्ताव व रजेचे अर्ज घेतले १७ ते २२ विषय स्थगीत केले होते विषय क्रमांक १७ व १८ वर चर्चा होणार आहे.

**मा.श्री.दिलीप सातपुते** :- इलेक्ट्रीक विभाग प्रमुख यांनी सतत माईक बंद पडतात याबाबत सभागृहाला खुलासा करावा.

इलेक्ट्रीक विभाग प्रमुख यांनी खुलासा केला.

**नगरसचिव** :- मा.राज्य निवडणुक आयोगाच्या आचारसंहिता परिपत्रकाचे वाचन केले.

**मा.श्री.संजय घुले** :- मागे सभा रद्द केली असतांना आता सभा का काढली.

**मा.श्री.अभिषेक कळमकर** :- आचार संहितेचे पत्र किती तारखेला आले.

**नगरसचिव श्री.तडवी** :- दिनांक १७/१०/२०१६ रोजी आचारसंहितेचे पत्र आले.

**मा.श्री.अभिषेक कळमकर** :- अजेंडा केंव्हा काढला.

**नगरसचिव श्री.तडवी** :- दिनांक १०/१०/२०१६ रोजी सन्माननीय सदस्यांचे घरी अजेंडा पोहोच केलेला आहे.

**मा.श्री.संजय घुले** :- नाशिक विभागीय आयुक्त साहेब यांचे पत्रान्वये महापौरांनी विरोधी पक्ष नेत्याची नेमणूक करणे त्याबाबतचा अहवाल आपणास सादर करणे बाबत लेखी दिले. त्या पत्रावर कारण काय दिले याचा खुलासा करण्यांत यावा.

**मा.महापौर साहेब** :- त्यात मुदत नाही आता करणारच आहोत विरोधी पक्ष नेते पदाची निवड.

**मा.श्री.अभय आगरकर** :- सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारले ॲक्ट मध्ये प्रश्न उपस्थित करावयाचे असतील तर १५ मिनिटे वेळ दिला जातो. सभागृहामध्ये चर्चेसाठी घ्यावा अशी विनंती करावयाची. ऐनवेळी प्रश्न सदस्य विचारु शकतो पण त्याला उत्तर द्यायचे किंवा नाही हा आमचा अधिकार आहे. सन्माननीय सदस्यांना विनंती आपण सुध्दा सभागृह चालवतो ऐनवेळी प्रश्न विचारतात ही पध्दत आपण बदलू सकारात्मक सुरुवात करु.

**मा.श्री.कैलास गिरवले** :- आगरकर साहेबांनी मांडलेला मुद्दा योग्य आहे. ऐनवेळी काही मुद्दे चर्चेला घ्यावे लागतात. मा.महापौरांचा अधिकार आहे प्रश्नाला उत्तर द्यायचे किंवा नाही. पण मा.आयुक्त यांनी हस्तक्षेप करुन उत्तर द्यावे.

**मा.श्री.अभय आगरकर** :- जोपर्यंत महापौर आदेश आयुक्तांना करीत नाहीत तोपर्यंत आयुक्त उत्तर देवू शकत नाही.

**मा.श्री.कैलास गिरवले**:- विभागीय आयुक्तांनी जे पत्र आपणाला दिले त्याचा खुलासा आपण केला का नाही.

**मा.श्री.दिप चव्हाण** :- सदरची सभाही तहकुब सभा आहे. ॲक्ट मध्ये प्रकरण २ पान नंबर ५८४ वर तरतुद आहे. आता जो प्रश्न उपस्थित केला त्याचे २ मिनीटात खुलासा करावा.

**मा.आयुक्त श्री.गावडे साहेब** :- अशा प्रकारचे विभागीय आयुक्तांकडून पत्र प्राप्त झाले. संबंधीत नगरसचिव विभागाकडे पाठविले आहे. विभागीय आयुक्तांकडे उचीत कार्यवाहीसाठी उत्तर पाठविण्यात येईल.

**मा.श्री.अनिल शिंदे** :- घुले साहेबांचे प्रश्नाचा खुलासा आयुक्त साहेबांनी केला आपण दिप चव्हाण यांना बोलण्याची संध्दी द्यावी.

**मा.श्री.संजय घुले** :- किती कालावधी याचा उल्लेख आहे का ?

**मा.आयुक्त श्री.गावडे साहेब** :- मी सभागृहाला सांगीतले नगरसचिव विभागाकडून उपायुक्तां मार्फत अहवाल मा.विभागीय आयुक्त, नाशिक विभाग नाशिक यांना पाठविण्यांत येईल.

**मा.उपायुक्त श्री.चारठाणकर** :- मा.विभागीय आयुक्तांकडून पत्र प्राप्त झाले आहे. खुलासा तयार करण्याचे काम प्रगती पथावर आहे. येत्या तीन-चार दिवसात अहवाल सादर केला जाईल.

**मा.सौ.रुपाली वारे** :- कालच्या लोकमत पेपरमध्ये बातमी आली अधिकृत धार्मिक स्थळाबाबत त्यावर चर्चा करण्यांत यावी.

**मा.आयुक्त श्री.गावडे साहेब** :- मा.उच्च न्यायालयाचे गृहविकास व नगर विकास विभाग यांनी परिपत्रक काढले दोन्ही परिपत्रक सर्व सदस्यांना संबंधीत विभागाने पाठविले त्यानुसार सर्व सदस्यांनी त्याचे पालन करावे.

**मा.श्री.कुमार वाकळे** :- जो सर्व्हे झाला तो चुकीचा आहे. महापौर अभिषेक कळमकर यांनी फेर सर्व्हेची मागणी केली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या गाईड लाईन प्रमाणे झालेला नाही. त्यामुळे फेरसर्व्हे करावा. मा.न्यायालयाच्या आदेशाच्या विरोधात नाही. ज्यांनी सर्व्हे केला त्यांना स्टेजवर बोलवा.

**मा.श्री.कैलास गिरवले** :- आपल्या लोकांनी सर्व्हे करतांना कशा पध्दतीने केला २००९ हे कशाच्या आधारे ठरवला. आयुष्यमान कसे ठरवले.

**मा.सौ.मनिषा बारस्कर** :- २००९ नंतरचे आदर्श कॉलनीतील मंदिर कसे काय आले. सावेडी गावातले काही मंदिर १०० वर्षा पुर्वीचे आहे तरी सुध्दा त्यांची नावे आली खुलासा करावा.

**नगररचनाकार श्री.पाटील** :- सर्व्हेक्षण करतांना मोठया प्रमाणात उणिवा आहेत. लोकांनी पुरावा देणे अपेक्षित होते. जागेवर गेल्यानंतर कोणी पुरावा देण्यासाठी पुढे आले नाही.

**मा.श्री.सुनिल कोतकर** :- मंदिरांची यादी वाचुन दाखवा.

**मा.श्री.दिप चव्हाण** :- पहिली नोटीस कधी दिली. कोणती मंदिरे कोणत्या स्लॅब मध्ये येतात. नवा मराठात नोटीस दिलेली आहे.

**नगररचनाकार श्री.पाटील** :- १०% लोक आले. जे आले त्यांनी सक्षम पुरावे आणले नाही तरी आपण पुरावा देण्यासाठी पुरेसावेळ देतांना नवामराठा व नगरटाईम्स मध्ये नोटीस दिली.

**मा.श्री.सचिन जाधव** :- वॉर्ड ऑफिसर किंवा त्याठिकाणाचे अधिकारी यांनी समक्ष स्थळ पाहणी करणे अपेक्षित होते. काही ठिकाणी ट्रस्ट स्थापन झाले नाही. काही ठिकाणी १०० वर्षापूर्वी चे मंदिरात लोक दर्शनासाठी जातात. महानगरपालिकेचे वेळोवेळी सर्व्हेक्षण केले जाते ते तपासणे महत्वाचे परत रिव्हीजन घेवून कारवाई करावी.

**मा.श्री.संजय घुले** :- सर्व्हे केलेला आहे. ते मंदिर वगळून पुर्ण सर्व्हेक्षण केले पाहिजे नगरपरिषद असतांना सर्व्हेक्षण झालेले आहे. पुन्हा सर्व्हेक्षण झाले पाहिजे असे सभागृहाला सांगतो.

**मा.श्री.अभय आगरकर** :- सदस्यांच्या भावना तीव्र आहे. वस्तूस्थिती नाकारुन चालणार नाही. सर्व्हे मधील उणीवा त्रुटी भरुन काढता येवू शकतो. पूर्ण सर्व्हेक्षण आपण करु शकतो काय ?

**मा.श्री.कुमार वाकळे** :- जे मंदिर कायदेशीर आहे त्याला जर हात लागला तर नगररचनाच्या ऑफिसवर जेसीबी फिरतील. लोकांच्या भावना काम करतांना लक्षात घ्या. भारताच्या कायद्या प्रमाणे काम चालले पाहिजे.

**नगररचनाकार श्री.पाटील** :- सर्व्हेक्षणातील उणीवा दूर करण्याचा प्रयत्न करण्यांत येईल. मा.न्यायालयाने अटी घालून दिले त्याचे पालन करणे आवश्यक आहे. सर्व्हेक्षणातील त्रूटी उणीवा दूर करण्याचा निश्चीत प्रयत्न करु.

**मा.श्री.अभय आगरकर** :- प्रभाग अधिका-यांना नियुक्त करा. त्यांना संबंधित मंदिराची यादी काढायला सांगा व त्यांच्याशी संपर्क करायला सांगा.

**नगररचनाकार श्री. पाटील** :- कालपासुन प्रभाग अधिकारी व नगररचना विभागाकडील कर्मचा-या मार्फत रॅपीड सर्व्हेचे काम सुरु केले आहे.

**मा.श्री.सचिन जाधव** :- सुप्रीम कोर्टाचे निर्देशा प्रमाणे कार्यवाही करा.

**नगररचनाकार श्री.पाटील** :- नोटीस दिल्याशिवाय कुठलीच कारवाई करता येणार नाही. सन्माननीय सदस्यांना विश्वासात घेवून निर्णय घेवू.

**मा.श्री.अभय आगरकर** :- माळीवाडयातील मंदिराची शेडयुल १ मध्ये नावे आहेत. खंडोबा मंदिर, शनि मंदिर याची नावे आली दुर्देवी आहे.

**मा.श्री.कुमार वाकळे** :- सर्व्हेक्षण कोणी केला त्यांना स्टेजवर बोलवा.

**नगररचनाकार श्री. पाटील** :- माहिती मागवून घेतो.

**मा.श्री.अभय आगरकर** :- जोपर्यंत ६ मंदिरांना नोटीस दिल्या का नाही. याची खात्री होत नाही तोपर्यंत कारवाई स्थगीत करा. हेअरिंगची संधी द्या.

**मा.श्री.कुमार वाकळे** :- १०० वर्षा पुर्वीची मंदिरे घेतली. नविन मंदिर सोडले त्यामुळे गैरसमज निर्माण झाले आहेत.

**मा.श्री.सचिन जाधव** :- सुप्रीम कोर्टाचे आदेशावर शासनाने GR काढला दिनांक १९/११/२०१६ चे पत्र वाचुन दाखवले आपल्याकडे पत्र आहे.

**मा.आयुक्त श्री.गावडे साहेब** :- सर्व सभागृहाचे निदर्शनास आणू इच्छितो सन २०१० मध्ये सर्वोच्च न्यायालयामध्ये एक पिटीशन दाखल झाले होते. मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल जनहीत याचिका क्रमांक १०४/२०१० मध्ये मा.उच्च न्यायालयाने अनधिकृत धार्मिक स्थळाबाबत काही गाईड लाईन दिल्या. नंतर हायकोर्टामध्ये पुन्हा एक रिट पिटीशन दाखल झाले. त्यानुसार वेळोवेळी शासन निर्णय निर्गमित झाले आहेत. दिनांक २९ सप्टेंबर २००९ नंतरची जी अनधिकृत धार्मिक स्थळे आहेत त्या धार्मिक स्थळावर दिनांक ३१/१२/२०१६ पुर्वी निष्काशनाची कारवाई पूर्ण करावयाची आहे. त्यानुसार दिनांक २९ ऑक्टोबर २०१६ व ०५ नोव्हेंबर २०१६ चे परिपत्रक शासनाने काढले आहे. दिनांक २९ सप्टेंबर २००९ पुर्वीच्या धार्मिक स्थळांच्या बाबतीत ०५ नोव्हेंबर २०११ चा शासन निर्णय काढण्यात आला आहे. तीन कॅटेगरी मध्ये वर्गिकरण करण्यांत आले आहे. त्यामध्ये जे

अ) डी.सी.रुल्स नुसार नियमित होवू शकतात.

ब) डेव्हलपमेंट प्लॅन व बिल्डींग कन्स्ट्रक्शन रुल्स अनुषंगाने नियमित होवू शकत नसेल तर दिनांक २९ सप्टेंबर २००९ पुर्वीची स्थळे दिनांक १७ नोव्हेंबर २०१७ पर्यंत काढण्याचे स्पष्ट निर्देश आहेत. २९ सप्टेंबर २००९ नंतरची ३१ डिसेंबर २०१६ पुर्वी निष्काशीत करणे आवश्यक आहे. २००९ पर्यंत नियमितीकरण व स्थलांतरीत करणे आवश्यक आहे.

एखादे धार्मिक स्थळ प्रायव्हेट प्रॉपर्टी असेल संबंधिताने स्थलांतरीत करण्याचा प्रस्ताव दिला तर स्थलांतरणासाठी परवानगी देण्याची तरतुद आहे. यासाठी दिनांक ३१ डिसेंबर २०१६ पर्यंत मुदत आहे. २९ सप्टेंबर २००९ पुर्वीच्या धार्मिक स्थळांना जानेवारी २०१७ मध्ये कारवाई सुरु होईल.

क) क कॅटेगरी मध्ये राज्य स्तरीय समितीच्या मान्यतेने सन १९६० पुर्वीची धार्मिक स्थळे निष्काशीत करणे अभिप्रेत आहे. सन १९६० ते २००९ पर्यंतची रस्त्यावरील व पदपथावरील धार्मिक स्थळांवर दिनांक १७ नोव्हेंबर २०१७ पर्यंत कारवाई करण्याचे निर्देश आहेत.

अशा प्रकारचा ५ मे २०१६ रोजीचा स्पष्ट शासन निर्णय आहे. त्याप्रमाणे गृह विभागाने दिलेल्या मुदती पाळण्याचा आपला प्रयत्न आहे. सर्व्हे एक वर्षापूर्वी झाला होता. पूर्वी फेर सर्व्हेक्षणाची ५ मे २०११ च्या GR मध्ये तरतूद होती. प्राथमिक सर्व्हे वृत्त पत्रात प्रसिध्द करण्याची तरतुद होती, आपले जे वृत्तपत्राचे रोटेशन होते त्याप्रमाणे त्या वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यांत आले आहे.

वृत्तपत्रात स्पष्ट केले होते की, एक महिन्यात माहिती सादर केली तर यादीत दुरुस्ती करता येईल. परंतु त्यास फार अल्प प्रतिसाद मिळाला. त्यामुळे यादी ही दुरुस्त होवू शकली नाही.

आपल्या हाताशी जी माहिती उपलब्ध आहे त्यानुसार कारवाई सुरु आहे. उणीवा, त्रूटी दूर करण्यासाठी १७ च्या मिटींगमध्ये क्वीक सर्व्हे करण्याचे, पुराव्याच्या दृष्टीने कागदपत्र मिळाली तर २००९ पूर्वीचे व नंतरचे कोणते हे ठरविण्याचा प्रयत्न त्या दृष्टीने सुरु आहे. आपल्या शहराचा नियोजनबध्द विकासासाठी रस्त्यात असलेल्या धार्मिक स्थळांच्या बाबत मा.हायकोर्टाने जे निर्देश दिले त्यानुसार आपण कार्यवाही करु.

**मा.श्री.दिप चव्हाण** :- ५७४ नुसार अ,ब व क मध्ये किती आले. १७ तारखेला कोणत्या लोकप्रतीनिधी बरोबर चर्चा झाली.

**नगररचनाकार श्री.पाटील** :- वर्गीकरणा बाबत कारवाई सुरु आहे. **२३ तारखेच्या मिटींगमध्ये** उपलब्ध पुराव्याच्या आधारे वर्गीकरण निश्चीत करण्याचे काम सुरु आहे. दिनांक १९ सप्टेंबर २००९ नंतरची आकडे पूर्ण झाले आहे.

**मा.श्री.दिप चव्हाण** :- नगरसेवकांच्या सुचनेनुसार कारवाई केली तर अडचणी येणार नाही. सर्वांना विश्वासात घेवून सर्वांना आवाहन करा.

**नगररचनाकार श्री.पाटील** :- तशी विनंती मा.आयुक्तांनी केली आहे. वेळोवेळी केलेल्या कारवाईच्या वृत्तपत्रात प्रसिध्द केले. आमदार साहेब उपस्थीत होते. जी धार्मिक स्थळे सुटलेली आहे. त्यांचाही समावेश करणे बाबत पदाधिकारी यांनी सुचविले. यादी अपडेट करणेबाबत जे काही चुकून आले असतील याबाबत सुचना केली आहे.

**मा.सौ.नलवडे** :- प्र.क्र. मधील गजानन महाराजांचे मंदिराचे फेर सर्व्हेक्षणा बाबत काल पत्र दिले आहे. नागरिकांचे समवेत फेर सर्व्हेक्षण करण्यात यावे.

**मा.श्री.संपत बारस्कर** :-फेर सर्व्हेक्षण करा पुरावे उपलब्ध करुन देणार आहेत.

**मा.उपमहापौर श्री.श्रीकांत छिंदम** :- मी मिटींगला होतो. त्यामध्ये २६ धार्मिक स्थळे काढले ते पाडायचे तुम्ही जे सर्व्हेक्षण केले ते चुकीचे आहे. सर्व्हेक्षणा मध्ये २००९ नंतरची दाखविली आहे. त्यामुळे पुन्हा सर्व्हेक्षण करा. जी मंदिर २००९ पूर्वीची असतील त्यांचे पुरावे पाहुन घ्या व पुरावे असतील तर ते वगळून टाका त्या दिवशी घडलेली चर्चा मी सांगीतली.

**मा.श्री.गणेश भोसले** :- आपल्याला टाईम लिमीट दिले का ? तेवढया वेळेत हे होणार का ?

**उपमहापौर श्री.श्रीपाद छिंदम** :- मिटींगमध्ये त्यांनी मान्य केले आहे. महानगरपालिकेच्या कर्मचा-यांनी सर्व्हे केला त्यात उणीवा आहेत.

**मा.श्रीमती.नसीम शेख** :- धार्मिक स्थळाची एखादी वीट जरी पाडली तर याठिकाणी दंगली होतील याची जाणीव ठेवून कार्यवाही करा.

**मा.श्री.अभिषेक कळमकर** :- जे परिपत्रक महाराष्ट्र शासनाने काढले ते इंग्लीशमध्ये आहे. B पॉईंट वाचून दाखविला. याची अंमलबजावणी केली नाही तर याची जबाबदारी मा.आयुक्त, मा.जिल्हाधिकारी व पोलिस अधिक्षक यांचेवर निश्चित केली जाणार आहे.
I पॉईंट मध्ये आपण पोलीस प्रोटेक्शन घेणार आहे. यामध्ये कोणी अडचणी निर्माण केल्या तर क्रीमीनल लॉ नुसार कारवाई होणार आहे. B ॲण्ड C कॅटेगरी मध्ये २९ सप्टेंबर २००९ नंतरच्या धार्मिक स्थळावर कारवाई करणे व त्या आधीच्या मंदिरांसाठी दिनांक १७ नोव्हेंबर २०१७ ची मुदत दिली आहे.

सर्व्हे बाबत प्रभाग अधिकारी यांनी संबंधीत नगरसेवकाला कळवायला पाहिजे. स्पीडने कारवाई चालू केली आहे. मा.हायकोर्टाचे आदेशानुसार या अतिक्रमणामुळे नागरिकांचा श्वास कोंडलेला आहे. तो मोकळा होणार आहे. आपण सडेतोड या ठिकाणी उत्तर देत नाही.

**उपायुक्त (सा) श्री.चारठाणकर** :- हा विषय अत्यंत संवेदनशील आहे. दिनांक १६ व १७ नोव्हेंबर रोजी २ बैठका महानगरपालिकेमध्ये संपन्न झाल्या. एका बैठकीला मा.पदाधिकारी उपस्थित होते व दुसरी बैठक महानगरपालिका स्तरीय समितीची झाली. मुळात याबद्दलचा आक्षेप सर्व्हेक्षणाचा आपण उपस्थीत करीत आहात. मा.हाय कोर्टाचे आदेश महानगरपालिका क्षेत्रातील २००९ नंतरच्या धार्मिक स्थळांना संरक्षण नाही याकरीता २००९ नंतरचे आहे किंवा कसे याबाबत काल निवेदन दिले कारवाईची वेळ येते त्यावेळी पुढे येतात. तुमच्याकडे जर पुरावे असतील तर ते आपण सादर करावेत. ३० नोव्हेंबर पर्यंत यादी मा.उच्च न्यायालयाला माहिती द्यावयाची आहे. प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहोचने शक्य नाही. पुरेसा प्रतिसाद मिळत नव्हता. ३० डिसेंबर २०१६ ला आम्ही जी यादी सांगू त्यावर कारवाई करणे आम्हाला बंधनकारक आहे.

नगर शहरात ३ धार्मिक स्थळांना बांधकाम परवानगी आहे. ५७१ ला परवानगी नाही वारंवार आवाहन करुन नागरिक पुरावे देत नाही. परवानगी घेतलेली नसते. १९६० पूर्वीच्या धार्मिक स्थळांचे रेग्युलरायझेशन करणेची तरतूद आहे. ३० नोव्हेंबर २०१६ पर्यंत आम्हाला यादी फायनल करायची आहे. प्रभाग अधिकारी यांना रॅपीड सर्व्हे करण्याचे आदेश दिले आहे. तुमच्या कडील पुरावे द्या. तुमच्याकडचे पुरावे असल्याशिवाय रेग्युलराईज होवू शकत नाही.

**मा.श्री.गणेश भोसले** :- सर्व सदस्यांनी लवकरात लवकर सर्व पुरावे द्यावे २५ तारखेपर्यंत मुदत द्यावी त्यामध्ये नागरिकांची चूक आहे. नोटीस लावल्यानंतर फोटो काढायला पाहीजे होते.

**मा.सौ.रुपाली वारे** :- कोणते पुरावे या करीता लागतील.

**मा.श्री.सचिन जाधव** :- जे मंदिर अनधिकृत असतील ते अधिकृत करण्याची तरतुद नगररचना ॲक्ट मध्ये महानगरपालिकेने सर्व्हे करुन त्या मंदिराला अधिकृत करण्यासाठी आपण नियमात बसून अधिकृत करण्याची कारवाई करावी.

**मा.आयुक्त श्री.गावडे साहेब** :- मा.स्थायी समिती चेअरमन यांनी उल्लेख केला सर्व्हेची आकडेवारी ५७४ पैकी पुराव्यानुसार आकडेवारी कमी जास्त होवू शकते. ५७४ पैकी ३०० मंदिर खाजगी जागेवर आहेत. डी.पी. रुल्सच्या चौकटीत नियमानुसार बसले तर नियमीत होवू शकतात.

पब्लीक प्रॉपर्टीवरचे नियमितीकरण शक्य होत नाही. दिनांक २९ सप्टेंबर २००९ पुर्वीच्या धार्मिक स्थळांबाबत दिनांक ३१ डिसेंबर २०१६ पर्यंत निष्काशन करावयाची मुदत पाळावी लागणार आहे. आम्ही जुन मध्ये सरकारी / निमसरकारी कागदपत्राची पुराव्यासाठी यादी दिली आहे. त्या नुसार कागदपत्र दिली तर त्याचा विचार होवू शकतो.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे** :- १० % बांधकाम ओपन स्पेसवर देता येते.

**मा.आयुक्त श्री.गावडे साहेब** :- ओपन प्लॉट व डी.पी.रस्त्यावरील बांधकामे पाडून आपणाला कारवाई करावी लागणार आहे. यापूर्वी वर्तमानपत्रात वेळोवेळी यादी जाहीर केली आहे. माझ्या सहका-यांशी चर्चा करुन २५ पर्यंत मुदत देतो सर्व जाती धर्म पंथ यांना विनंती आपण सर्व पुराव्यानिशी आलात तर वर्गिकरण करतांना विचार करता येईल. आपण मतदार संघातील नागरिकांना माहिती द्यावी आम्ही अंधारात काही करणार नाही. लपुन छपुन काही करणार नाही.

**मा.श्री.अभिषेक कळमकर** :- प्रसिध्दी विभागाकडून कळवा वर्तमानपत्रत मराठी भाषेत प्रसिध्द करा.

**मा.श्री.गणेश भोसले** :- फिरते शौचालयाला दिवाळीचे दिवसात आग लागली. अग्निशमन विभागापासून हाकेच्या अंतरावर आहे तरी आपण आग विझवू शकलो नाही. अग्निशमन विभागाकडे माणस नाही, फुलफील नाही. या बाबत वारंवार मी मांडले आहे. दुसरा विषय अग्नीशमन विभाग प्रमुख यांनी दिनांक २२/२/२०१६ ला पत्र दिले. साधनसामुग्री कमी आहे. एखादी जर दुर्घटना घडली तर मी त्याला जबाबदार राहणार नाही. वारंवार ते प्रशासनास असे कळवितात. होस पाईप खराब, पाईप लिकेज, गाडी नादुरुस्त आहे. एखादी मोठी दुर्घटना जर झाली तर काय करणार. ५ हजाराचे बील तुम्ही काढीत नाही. यात जर कोणी दगावले तर याची जबाबदारी आयुक्त साहेब तुमची राहणार आहे.

**मा.श्री.अभय आगरकर** :- प्रत्येक ५० हजार लोकसंख्येला एक फायर स्टेशन पाहीजे असे कायदा सांगतो आपल्याकडे ३ फायर स्टेशन आहे. याबाबत कृती आराखडा करुन विषय संपविला पाहीजे. फायर स्टेशन कडे कार्यरत असलेल्या कर्मचा-याची नियमित ड्रील सुध्दा होत नाही. त्यांचा फिजीकल फिटनेस तपासला गेला पाहीजे, असे येथे होत नाही. यासंदर्भात विषय गंभीरता पूर्वक घ्या.

**मा.श्री.गणेश भोसले** :- एम.एच.१६ डी.१४१ हे वाहन ४३ दिवस बंद होते दुरूस्तीसाठी खर्च ९५० येत होता.

**मा.श्री.सुनिल कोतकर** :- केडगांव येथील अग्नीशमन केंद्रासाठी एकपण गाडी नाही. मोतीनगर मध्ये एक दुर्घटना घडली ओपन फ्लॅटमध्ये आग लागली शेजारच्या घरामध्ये बेड व एसी जळाला आहे. सदर ठिकाणी शिक्षक कुटुंब रहाते ते बाहेरगावी होते. शेजा-यांनी जर पाहीले नसते व घरामध्ये जर एखादा मुलगा असता व दुर्घटना घडली असती तर जी घटना घडली त्याला कोण जबाबदार असते. केडगांव येथील वर्षापूर्वी अग्निशमन केंद्राचे वर्षापूर्वी उद्‌घाटन झाले. याठिकाणी कर्मचारी कोणीही उपस्थीत नसतात. आग विझल्यानंतर आपली गाडी तेथे पोहोचते.

**मा.श्री.अभिषेक कळमकर** :- सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची ठरते भोसले साहेबांनी सांगीतले जे पत्र अग्नीशमन विभाग प्रमुख यांनी दिले त्यांचेकडे जर साहित्य नसेल तर कार्यवाही कशी करणार यापुढे एखादी घटना जर घडली तर यासाठी महापौर व आयुक्त जबाबदार राहतील. ड्रायव्हर या ठिकाणी उपलब्ध नाही. तहसील कार्यालयासमोर एखादे दिवस गाडी उपस्थित असते. याकडे कोणाचे लक्ष नसते. गांभीर्याने लक्ष द्या. त्यांचे काही प्रश्न जाणून घ्या. निश्चीत प्रकारे आउटपुट काढा.

**मा.श्री.सचिन जाधव** :- जे कर्मचारी कमी पडतात ते मानधनावर घेणे बाबत आम्ही वेळोवेळी सांगीतले लवकरात लवकर २-३ दिवसात याबाबत कारवाई करावी.

**मा.श्री.गणेश भोसले** :- एवढया जवळ केंद्र असुनही ते आग का विझवू शकलो नाही याबाबत खुलासा करावा.

**अग्निशमन विभाग प्रमुख श्री. मिसाळ** :- दिनांक २५/१०/२०१६ ला जी आग बेग पटांगण मध्ये लागली १ गाडी फाटाका स्टॉल जवळ होती. कचरा डेपोला आग लागल्यामुळे १ गाडी तेथे गेली होती. सूचना मिळाल्यानंतर तात्काळ फटाका स्टॉलवरुन गाडी कॉल करुन आग विझवली. कर्मचारी उपलब्धते मुळे आपण केडगांव साठी गाडी ठेवू शकत नाही.

**मा.श्री.सुनिल कोतकर** :- २-३ कर्मचारी उपस्थीत असतात. फक्त फोन घेण्याचे काम करतात. गाडी नसते.

**अग्निशमन विभाग प्रमुख श्री. मिसाळ** :- केडगांवच्या फायर स्टेशनला जर कॉल लावला तर मुख्यालयाला कॉन्टॅक्ट करण्यासाठी ते कर्मचारी आहेत.

**मा.श्री.गणेश भोसले** :- प्रशिक्षीत कर्मचारी किती आहे.

**अग्नीशमन विभाग प्रमुख श्री.मिसाळ** :- १२ कर्मचारी प्रशिक्षीत आहेत.

**मा.श्री.सुनिल कोतकर** :- मागच्या बैठकीत मानधनावर कर्मचारी घेणे बाबत सूचना दिल्या पण अद्याप का कार्यवाही झाली नाही.

**मा.श्री.अभय आगरकर** :- या संदर्भात एक मिटींग कॉल करा. व संबंधीत नगरसेवकाला माहिती द्या.

**उपायुक्त श्री.चारठाणकर** :- कमीत कमी ७ ठिकाणी अग्नीशमन केंद्र पाहीजेत. सध्या ३ केंद्र आहे. शहर, सावेडी व केडगांव उपकेंद्र आहे. होम टेंडर आहे. वॉटर टेंडर - १ आहे. जीप मिनीटेंडर २ आहेत. छोटी आग विझविण्यासाठी २ बुलेट आहेत. तुलनेने ते कमी आहेत.

६.५० कोटी रुपयांची मागणी आपण केली. सभागृहाच्या भावना लक्षात घेता आणखी ४ केंद्रासाठी मुख्य अग्नीशमन सल्लागार याचे मार्गदर्शन घेण्यांत येईल.

**उपायुक्त श्री.चारठाणकर** :- माजी सैनिकांच्या मुलाखती यासाठी घेतल्या होत्या. स्थायी समिती मध्ये चर्चेनुसार प्रस्ताव मागविले माजी सैनिकांचा रिस्पॉन्स मिळाला. ५६ माजी सैनिकांच्या मुलाखती मी घेतल्या. शासनाने आउट सोर्सींग करण्याचे दिलेल्या आदेशानुसार आपण कारवाई सुरु केली. अग्नीशमन विभागासाठी मानधनावर नेमणूकी बाबत महासभेने जर निर्देश दिले तर त्यानुसार कारवाई करता येईल.

**मा.श्री.सचिन जाधव** :- याच विभागासाठी अट्टाहास का ?

**मा.श्री.अभिषेक कळमकर** :- एकाच वेळेस २-३ ठिकाणी आग लागल्या तर काय करणार तुम्हाला यामध्ये गांभीर्यतेने घ्यावे लागेल.

**मा.श्री.गणेश भोसले** :- मा.महापौर यांना आदेश द्या. कर्मचारी भरायला सांगा. कायदेशीर रित्या काय असेल ते करुन घ्यायला सांगा.

**मा.श्री.दिप चव्हाण** :- बाहेर एक शिष्ठ मंडळ आले होते. नेहरुमार्केट संदर्भात निवेदन दिले आहे. २०१० ला मनपाने स्वतःच्या पैशाने बांधावा असा ठराव झाला ४५१ खाली रद्द झालेले नाही. नगरविकास सचिव यांनी अहवाल सादर करणे बाबत पत्र आहे. शाकीर शेख, संजय झिंजे यांची भावना सभागृहासमोर मांडली.

संस्थेच्या हिताच्या दृष्टीकोनातून त्यांची मागणी व आपली मागणी, कायदेशीर तरतुदी संदर्भात चर्चा झाली या संदर्भात योग्य निर्णयाबाबत याठिकाणी सांगीतले तर बर होईल. सर्व सदस्यांच्या भावना विचारात घेवून आपण सांगावे.

**मा.श्री.कैलास गिरवले** :- गेल्या अनेक वर्षापासून प्रश्न रेंगाळलेला आहे. अनेक वेळा याबाबत चर्चा झाली महानगरपालिकेने स्वतः बांधकाम करावयाचे डिपॉझिट म्हणून चांगली रक्कम आपणाला मिळू शकते. पण तसे झाले नाही. दोन दिवसापूर्वी मा.दत्ता कावरे यांनी नवि सचिव यांना निवेदन दिले त्या निवेदनात स्पष्ट आहे की, एका नगरसेवकाच्या घशात घालण्यासाठी हा उद्योग चालू आहे. तसे याबाबत कावरे यांनी खुलासा करावा. आमची मानहानी होत आहे. गंभीर स्वरुपाचा आरोप तुम्ही केला.

**मा.श्री.दत्ता कावरे** :- योग्य वेळ आल्यावर सांगू. मी पण जबाबदार नगरसेवक आहे. जबाबदारीने आरोप केला आहे.

**मा.श्री.अभय आगरकर** :- सभेतील पहिले २ विषय नॉमिनल आहेत.

**मा.श्री.कैलास गिरवले** :- मा.महापौर यांना विनंती अपणाला जर नाव माहित असेल तर खुलासा करावा.

**मा.श्री.अनिल शिंदे** :- विषय मंजूर करण्यात यावा.

**ज्यु.इंजिनियर श्री.मेहेत्रे** :- नेहरुमार्केट बाबत निविदा कॉल केली होती पण निविदा ओपन केली नाही. मा.कोर्टात केस दाखल असल्यामुळे निविदा ओपन केल्या नाही. मा.कोर्टाने आदेश दिले तर निविदा उघडण्यांत येईल.

**मा.महापौर साहेब** :- विषय मंजूर

**---*---**

**ठराव :-**

सभागृहातील चर्चेनुसार ऑफीस रिपोर्ट मंजूर. मा.शासनाच्या मार्गदर्शनाप्रमाणे अहमदनगर महानगरपालिकेच्या मा.सर्वसाधारण सभेच्या विषयपत्रिकेवर कायम स्वरुपी घेण्यात आलेल्या विषयात नमुद मुलामुलींचे गुणोत्तर प्रमाणाच्या माहितीचे अवलोकन केले.

नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सूचक** :- मा.श्री.सचिन तुकाराम जाधव

**अनुमोदक** :- मा.श्री.अनिल माधवराव शिंदे

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक : १८** **दिनांक : १९ / ११ /२०१६.**

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या प्रत्येक महिन्याच्या सर्वसाधारण सभेमध्ये स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत या योजने बाबत अंमलबजावणीची माहिती देणे.

**---*---**

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ :-मा.जिल्हाधिकारी कार्या.नपा/कार्या./एन.यु.एल.एम./६११/२०१५
दिनांक ३०/१२/२०१५ चे पत्र.

उपरोक्त विषयाबाबत अहमदनगर महानगरपालिकेस स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत एकुण ३८८५ वैयक्तिक शौचालय बांधणे बाबत उद्दीष्ट देण्यात आले होते. सदर बाबत महानगरपालिकेस प्राप्त झालेले अनुदान व त्याचा विनियोग खालील प्रमाणे

| **अ.क्र.** | **तपशिल** | **संख्या** | **रक्कम** |
|---|---|---|---|
| १ | मनपाचे वैयक्तिक / सामुदायीक शौचालय उद्दीष्ट | ३८८५ | |
| २ | सर्वेक्षण अंती वैयक्तिक शौचालय बांधकाम बाबत मंजुर प्रकरणांची संख्या | २५४६ | |
| ३ | पहिला हप्ता अनुदान वितरीत | २४९९ | १४९.९४ लक्ष |
| ४ | दुसरा हप्ता अनुदान वितरीत | ७२८ | ४३.६८ लक्ष |
| ५ | वैयक्तिक शौचालय बांधकाम पुर्ण केलेल्या कुटुंबाची संख्या | १३२३ | |
| ६ | वैयक्तिक शौचालय बांधकाम प्रगतीपथावर | ६१२ | |
| ७ | वैयक्तिक शौचालय बांधकाम अद्यापपर्यंत सुरु न केलेल्या कुटुंबाची संख्या | ५९७ | |
| ८ | सामुदायीक शौचालय प्रस्तावित | १०० सीट | ४०.१३ लक्ष |

तरी वरील प्रमाणे स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत योजनेच्या अंमलबजावणी बाबत अहवाल मा.महासभेकडेस माहितीस्तव सादर.

**---*---**

**चर्चा :-**

**ज्यु.इंजिनियर श्री.मेहेत्रे** :- स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत अहमदनगर महानगरपालिकेस एकुण हप्ता रक्कम रु. ३१२.७६ लक्ष अनुदान प्राप्त झाले आहे. वैयक्तीक शौचालयाकरीता एकूण प्राप्त अर्जांची संख्या ४०९७ आहे. सद्यस्थितीत पहिल्या हप्त्याची एकुण २५३२ लाभार्थी बँक खात्यामध्ये रक्कम रुपये ६००० जमा करण्यांत आली आहे. दुस-या हप्त्यापोटी एकुण ३२३ लाभार्थ्यांना रुपये ६००० प्रमाणे लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्यांत आले आहेत. दुस-या हप्त्याबाबत दिनांक ०३/११/२०१६ रोजीच्या शहर स्तरीय समितीमध्ये दुसरा अनुदानाचा हप्ता वितरीत करणे बाबत एकुण ५४३ प्रकरणे मंजूर करण्यांत आली आहेत. वैयक्तीक शौचालय बांधकाम पूर्ण केलेल्या लाभार्थ्यांची संख्या १४६८ आहे. अद्यापपर्यंत बांधकाम चालू न केलेल्या लाभार्थ्यांची संख्या ४५६ आहे.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे** :- सार्वजनिक शौचालय कोठे उभारणार ?

**ज्यु.इंजिनियर श्री.मेहेत्रे** :- ५ कुटुंबामागे एक शौचालय ज्याठिकाणी अर्ज नामंजूर केले त्या ठिकाणी.

**मा.श्री.योगीराज गाडे** :- ज्यांनी अद्याप बांधकाम केले नाही त्यांच्यावर कारवाई केंव्हा करणार.

**ज्यु.इंजिनियर श्री.मेहेत्रे** :- ३१ मार्च २०१७ पर्यंत कारवाई करावयाची आहे. अद्यापपर्यंत बांधकाम चालू न केलेल्या लाभार्थ्यांची संख्या ४५६ आहे.

**मा.श्री.दिप चव्हाण** :- ४५६ लोकांवर गुन्हे दाखल करता, बँकेला पत्र देण्यापूर्वी लाभार्थ्यांना पत्र द्यायचे होते. तुम्ही त्यांना संधी द्या.

**ज्यु.इंजिनियर श्री.मेहेत्रे** :- आपण त्यांना २-३ वेळेस नोटीस दिल्या पण अद्याप बांधकाम सुरु केलेले नाही. प्रकरण मंजूर करतांना आदेशामध्ये फौजदारी कारवाईचा उल्लेख केला आहे.

**मा.श्री.दिप चव्हाण** :- सर्व्हे परिपूर्ण करत नाही. वॉर्ड इन्स्पेक्टर सर्व्हे करतात.

**ज्यु.इंजिनियर श्री.मेहेत्रे** :- कंपनीचे लोक सर्व्हे करतात. ८ इंजिनियर व ८ एस.आय.च्या टीमने सर्व्हे केला आहे.

**मा.श्री.दिप चव्हाण** :- त्या लोकांना परत एकदा नोटीस द्या एक महिन्याची मुदत द्या. नोटीस मध्ये नाईलाजास्तव फौजदारी कारवाई करावी लागेल असा उल्लेख करा.

**मा.श्री.अभय आगरकर** :-मा.शासनाने चांगली योजना आणली योजना यशस्वी होण्यासाठी आपण प्रयत्न केले आहेत. महानगरपालिकेच्या वतीने प्रसिध्द करा. आठवडयाच्या मुदतीत कारवाई केली नाही तर फौजदारी कारवाई करण्यात यावी.

**मा.श्री.अभिषेक कळमकर** :- २०० कंटेनर साठी ठराव केला होता. त्याबाबत काय झाले.

**ज्यु.इंजिनियर श्री.मेहेत्रे** :- महासभेकडे प्रस्ताव आहे. पुढच्या महासभे समोर येणार आहे.

**मा.श्री.संपत बारस्कर** :- मागच्या सभेनंतर नगर शहरातील खड्यांची आपण पाहणी केली आपण १५ दिवसानंतर शहर व उपनगरातील खड्डे पॅचींग करु असे सांगीतले. किती उपनगरातील खड्डे पॅचींग झाले याबाबतची माहिती द्यावी.

**शहर अभियंता श्री.सोनटक्के** :- खड्याचे काम पत्रकार चौक, अप्पू चौक, दिल्लीगेट, अमरधाम ते माळीवाडा काम केले आहे. भिस्तबाग, कुष्ठधाम पाईप लाईन रस्ता, शिला विहार चौक, गणपती मार्ग, मोहरम मार्ग पॅचिंग केला.

**मा.श्री.संपत बारस्कर** :- पॅचींग केली का मेन डी.पी. रोड वरचे रस्ते बुजविले नाही.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे** :- सावेडी नाक्याने रस्त्यावरुन फिरुन पहा.

**मा.श्री.संपत बारस्कर** :- सावेडी नाका ते पाईप लाईन रस्ता आज मटेरियल पडणार आहे आम्ही पत्र देवून किती दिवस झाले. मा.महासभेत गोंधळ

**मा.श्री.स्वप्नील शिंदे** :- पॅचींगची पध्दत आम्ही सोनटक्के साहेबांना विचारली त्यांनी सांगीतले चौकोनी खड्डा घेतो व इतर माहिती दिली. मा.आयुक्त साहेब त्या ठिकाणी आले तूम्ही ज्या पध्दतीने सांगता त्या पध्दतीने पॅचींग होत नव्हते आम्ही आयुक्तांना विचारले आपण याच्यावर ॲक्शन का घेतली.

**मा.श्री.संपत बारस्कर** :- इतक्या दिवसात खड्डे का बुजविले नाही. याबाबत यादीसह पत्र दिले. वॉर्डातील नागरीक आम्हाला विचारतात. वारंवार आंदोलनाची वेळ येवू देवू नका.

**मा.श्री.स्वप्नील शिंदे** :- ४० कोटीमध्ये ७०% कामे रस्त्याची आहे आयुक्तांना भेटून सांगीतले पावसाळा संपलेला आहे. कॉन्ट्रॅक्टर अद्याप काम सुरु करीत नाही.

**शहर अभियंता श्री.सोनटक्के** :- संबंधित ठेकेदार यांची मा.आयुक्त व मा.महापौर यांचेकडे बैठक घेतली. १४० कामापैकी ४७ काम प्रगतीत आहे.केडगांवचे काही काम प्रगतीत आहे.

**मा.श्री.स्वप्नील शिंदे** :- किती

**शहर अभियंता श्री.सोनटक्के** :- १४० कामा पैकी १२५ कामाच्या वर्क ऑर्डर झाल्या. वर्कऑर्डर होवून ४ १/२ महिने झाले ज्या रस्त्यांना वर्क ऑर्ड दिली त्या रस्त्यावर पॅचींग करीत नाही.

**मा.श्री.स्वप्नील शिंदे** :- कोण ठेकेदार आहे.

**शहर अभियंता श्री.सोनटक्के** :- ए.सी कोठारी

**मा.श्री.स्वप्नील शिंदे** :- अद्यापही काम करायला तयार होत नाही. सदर कॉन्ट्रॅक्टरला काळया दीत का टाकत नाही. आम्ही रस्ता आयुक्तां समोर खोदून दाखविला.

**मा.महापौर साहेब** :- पावसाळा असल्याने पॅचींगचे काम करता आले नाही. आता काम सुरु आहे.

**शहर अभियंता श्री.सोनटक्के** :- जे काही खड्डा भरला होता पण तोच रस्ता उखडू नये म्हणून मोठा स्प्रेड केला सिध्दीबागे जवळ खडी टाकून ग्राउटींग करुन, पॅचींग करण्यात आले.

**मा.महापौर साहेब** :- श्री. सोनटक्के यांनी पॅचींग बाबत लक्ष देवून काम करुन घ्यावे.

**मा.श्री.सचिन जाधव** :- विषय मंजूर करण्यात यावा. आचार संहिता असल्याने १९ ते २२ स्थगीत ठेवण्यांत यावेत.

**मा.महापौर साहेब** :- विषय मंजूर, आचार संहिता असल्याने विषय क्र. १९ ते २२ स्थगीत ठेवण्यांत येत आहे.

**ठराव :-**

ऑफीस रिपोर्ट मंजूर. मा.शासनाच्या मार्गदर्शनाप्रमाणे अहमदनगर महानगरपालिकेच्या मा.सर्वसाधारण सभेच्या विषयपत्रिकेवर कायम स्वरुपी घेण्यात आलेल्या विषयात नमुद स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत या योजने बाबत अंमलबजावणीच्या माहितीचे अवलोकन केले.

नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**सूचक** :- मा.श्री.सचिन तुकाराम जाधव

**अनुमोदक** :- मा.श्री.बाबासाहेब सोन्याबापू वाकळे

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक : १९/१** **दिनांक : १९ / ११ /२०१६.**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेतील कर्मचा-यांच्या रुपये एक लाखापेक्षा जास्त वैद्यकीय खर्चाच्या प्रतीपुर्ती देयकाबाबत.(१)श्री.किशोर दत्तात्रेय कानडे, लिपीक, यांचे वैद्यकीय प्रतीपुर्ती बाबत...

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

विनंती रिपोर्ट सादर करण्यात येतो कि, मा.महाराष्ट्र शासन,सार्वजनीक, आरोग्य विभाग,शासन निर्णय क्र.एम एजी २००५/९/ प्र.क्रं.१, आरोग्य ३,मंत्रालय,मुंबई दि.१९ मार्च २००५ अन्वये शासकीय कर्मचा-यांनी व त्यांच्या कुटूंबीयांनी आकस्मिक शासकीय निकडीच्या प्रसंगी घेतलेल्या खाजगी रूग्णालयातील अंतररूग्ण उपचाराच्या वैदयकिय खर्चाच्या प्रतिपूर्ती मंजूर करण्यांत आलेली आहे.

त्या अनुषंगाने अहमदनगर महानगरपालिकेमधील कर्मचा-यांना वैदयकीय खर्चाची प्रतिपुर्ती योजना लागु करण्यांस मा.महासभा ठराव क्रमांक २ दि.३/११/२००७ अन्वये ठराव पारित करण्यांत आलेला आहे. त्यानुसार जा.क्र.आस्था.३५१ दि.२९/४/२००८अन्वये कार्यालयीन परिपत्रकानुसार कर्मचा-यांना वैदयकिय खर्चाची प्रतीपुर्ती योजना दि.१/४/२००८ पासुन लागू करण्यांत आलेली आहे.

तदनंतर मा. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांक वैखप्र २०११/ प्र.क्र.३३३ /११/ राकवि २, मंत्रालय,मुंबई दिनांक १६ नोव्हेंबर २०११ अन्वये दिनांक १९ मार्च २००५ चे शासन निर्णयात बदल करून प्रतिपुर्तीच्या अनुज्ञेयतेची कमाल मर्यादा रू.४००००/- वरून रू.१०००००/- पर्यत वाढविण्यात आलेली असून सदर प्रतिपुर्तीस मंजुरीचे अधिकार संबंधीत विभाग प्रमुखांना देण्यात आलेले आहेत व रू.१०००००/- पेक्षा जास्त वैदयकिय खर्चाच्या प्रतिपुर्तीचे प्रकरणांना महाराष्ट्र राज्य सेवा (वैदयकिय देखभाल)नियम १९६१ व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयामधील तरतुदीच्या अधिन राहुन मंजुरी देण्याचे अथवा उचित निर्णय घेण्याचे पुर्ण अधिकार संबंधीत मंत्रालयीन प्रशासकीय विभाग प्रमुखांना देण्यात आलेले आहेत.

सदरचे शासन निर्णयानुसार महापालिकेमध्ये कायम कर्मचा-यांचे रू.१०००००/- पर्यतचे व एक लाखापेक्षा जास्त वैदयकिय खर्चाचे परतावा देयक मंजुर करणे बाबतचा प्रस्ताव मा.महासभा, अहमदनगर महानगरपालिका यांचे समोर मान्यते करीता सादर करण्यात आला असता मा.महासभेने दिनांक २६/५/२०१२ रोजी खालील प्रमाणे ठराव पारित केलेला आहे.

" ऑफिस रिपोर्ट व सभागृहातील चर्चा पहाता रक्कम रू.एक लाखापर्यत कायम कर्मचा-यांना वैदयकिय खर्चाची प्रतिपुर्ती देणे बाबत मा.आयुक्त, अहमदनगर महानगरपालिका यांनी कार्यवाही करावी तसेच रक्कम रूपये एक लाखापेक्षा जास्त वैदयकिय खर्चाच्या प्रतिपुर्ती देणे बाबत ऑफिस रिपोर्ट मध्ये नमुद असलेल्या कर्मचा-यांची वैदयकिय प्रतिपुर्ती यादी बाबत कार्यवाही करणेस मंजूरी देण्यात येत आहे.तसेच असे देखील ठरविण्यात येते की, एक लाख रकमेच्या पुढील कर्मचा-याच्या आरोग्य प्रतिपुर्ती बाबत प्रकरण तपासुन मा.आयुक्त, यांनी महासभेच्या मंजुरीसाठी ठेवण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.नियमानुसार पुढील उचित कार्यवाही करावी."

त्यानुसार अहमदनगर महानगरपालिकेमधील कर्मचा-यांना वैदयकिय खर्चाची प्रतिपुर्ती देयके संबंधीत विभाग प्रमुख यांचे मार्फत सादर केलेली आहेत. सदरची देयके मुख्य वैदयकिय अधिकारी

कै.बा.दे. दवाखाना,यांनी सदरच्या देयकामधील आजाराची पडताळणी केलेली असुन संबंधीत आजार शासन विर्निदिष्ठ यादीत समाविष्ट आहेत असे कळविले आहे.परंतु सदरच्या कर्मचा-यांनी दाखल केलेली बिले हे शासनाने ठरवून दिलेल्या दवाखान्या व्यतिरीक्त आहे. असे कळविले आहे.

तसेच श्री.किशोर दत्तात्रय कानडे, लिपीक यांनी दिनांक १२/०४/२०१६ रोजी सदर वैद्यकीय प्रतिपुर्तीचे बिल सादर केलेले असुन सदरचे बिल हे मुख्यलेखा परिक्षक यांचेकडुन तपासणी करुन घेणेत आलेले आहे. सदर बिलाची रक्कम रु.१,११,०४३/- इतकी देय इरत आहे.

वैदयकिय खर्चाची प्रतिपुर्ती योजना देयके अदा करणेसाठी आर्थिक वर्षा करीता सन२०१६-१७ या वर्षामध्ये रू.६०,००,०००/- (अक्षरी रुपये साठ लाख) इतकी तरतुद केलेली आहे.सदर योजने अंतर्गत खालील तक्त्यामधील एकुण एक कर्मचारी यांनी वैदयकिय खर्च परतावा देयक सादर केलेली असुन त्याची एकूण रक्कम रू.१,११,०४३/- इतकी होत आहे.

| अ.क्र. | कर्मचा-यांची नाव | हुददा | रूग्णाचे नांव व कर्मचा-याशी नाते | मा.शासन निर्णयातील आजार क्र | आजाराचे स्वरूप | मागणी रक्कम | देय रक्कम ९०% |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | श्री.किशोर दत्तात्रय कानडे | लिपीक | सौ.ज्योती किशोर कानडे (पत्नी) | ०७ | Accateabtomin pains | १,२३,३८२/- | १,११,०४३/- |
| | | | | | | **एकुण** | **१,११,०४३/-** |

मा.शासनाचे दिनांक १६ नोव्हेंबर २०११ चे शासन निर्णयानुसार रूपये एक लाखापर्यंतचे वैदयकिय खर्चाचा परतावा देयके मंजूर करणे बाबतचे अधिकार संबंधित विभाग प्रमुखांना देण्यात आलेले आहे. तसेच एक लाखाच्या पुढील रक्कमेचा वैदयकिय खर्चाचा परतावा देयके मंजूर करण्याचे अधिकार संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभाग प्रमुखांना देण्यात आलेले आहे. सदर बाबत रुपये एक लाखाचे पुढील वैद्यकीय खर्च परतावा देयके मंजूर करणे बाबतचा प्रस्ताव मा.महासभेपुढे सादर करणेत आला होता. त्यानुसार मा.महासभेच्या दिनांक २६/५/२०१२ रोजीच्या ठरावानुसार रूपये एक लाखाचे पुढील वैदयकिय खर्चाचे प्रतिपुर्ती देणे बाबत मा.महासभेमार्फत अदा करणे बाबत ठराव मंजूर झालेला आहे.

तरी सदर वैदयकिय खर्च देयकाची रक्कम रू.१,११,०४३/- (अक्षरी एकुण रुपये एक लाख अकरा हजार त्रेचाळीस फक्त) इतकी आहे. लेखा विभागा मार्फत श्री.किशोर दत्तात्रेय कानडे यांना अनुज्ञेय होती. व सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाकरीता वैदयकिय खर्च देयकापोटी रूपये ६०,००,०००/- इतकी तरतूद मंजूर केलेली असुन सदर तरतुदी पैकी रुपये ५८,९८,३९२/- इतकी शिल्लक आहे. तसेच सदर देयकांची मुख्य लेखा परिक्षक यांचेकडुन तपासणी केलेली असुन वैद्यकीय खर्च प्रतीपुर्ती रक्कम ही एक लाखा पेक्षा जास्त असल्याने उपरोक्त दिनांक २६/०५/२०१२ रोजीचे मा.महासभेच्या ठरावा नुसार सदर रक्कम संबंधितास अदा करणेकामी सदर देयके मा.महासभेच्या निर्णयास्तव सादर करणेस रिपोर्ट मंजुरीस्तव आदेशार्थ सादर.

यावर सहाय्यक आयुक्त श्री.साबळे यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.
यावर मुख्यलेखाधिकारी श्री.झिरपे यांची सहमती दर्शक स्वाक्षरी असे.
यावर मा.उपायुक्त (सा) श्री.बेहेरे साो यांचा अभिप्राय की, अ, नूसार आदेशार्थ सादर.
यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, अ नुसार प्रस्ताव मा.महासभेकडे सादर करावा.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक : १९/२** **दिनांक : १९ / ११ /२०१६.**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेतील कर्मचा-यांच्या रुपये एक लाखापेक्षा जास्त वैद्यकीय खर्चाच्या प्रतीपुर्ती देयकाबाबत.. (२) श्री.खेमनर पाटीलबा रावजी, इलेक्ट्रीक लिपीक यांचे वैद्यकीय प्रतीपुर्ती बाबत

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ :- १.मा.महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्र.एमएजी २००५/९/ प्र.क्र.१/आरोग्य ३ मंत्रालय,मुंबई दिनांक १९ मार्च २००५

२.मा.महासभा ठराव क्र.२ दिनांक ०३/११/२००७.

३.मा.महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्र.वैखप्र २०११/प्र.क्र.३३३/ ११/राकावी २, मंत्रालय,मुंबई दिनांक १६ नोव्हेंबर २०११

४.मा.महासभा ठराव क्र.९ दिनांक २६/०५/२०१२

विनंती रिपोर्ट सादर करण्यात येतो कि, मा.महाराष्ट्र शासन,सार्वजनीक, आरोग्य विभाग,शासन निर्णय क्र.एम एजी २००५/९/ प्र.क्रं.१, आरोग्य ३,मंत्रालय,मुंबई दि.१९ मार्च २००५ अन्वये शासकीय कर्मचा-यांनी व त्यांच्या कुटूंबीयांनी आकस्मिक शासकीय निकडीच्या प्रसंगी घेतलेल्या खाजगी रूग्णालयातील अंतंररूग्ण उपचाराच्या वैदयकिय खर्चाच्या प्रतिपूर्ती मंजूर करण्यांत आलेली आहे.

त्या अनुषंगाने अहमदनगर महानगरपालिकेमधील कर्मचा-यांना वैदयकीय खर्चाची प्रतिपुर्ती योजना लागु करण्यांस मा.महासभा ठराव क्रमांक २ दि.३/११/२००७ अन्वये ठराव पारित करण्यांत आलेला आहे. त्यानुसार जा.क्र.आस्था.३५१ दि.२९/४/२००८अन्वये कार्यालयीन परिपत्रकानुसार कर्मचा-यांना वैदयकिय खर्चाची प्रतीपुर्ती योजना दि.१/४/२००८ पासुन लागू करण्यांत आलेली आहे.

तदनंतर मा. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांक वैखप्र २०११/ प्र.क्र.३३३ /११/ राकवि २, मंत्रालय,मुंबई दिनांक १६ नोव्हेंबर २०११ अन्वये दिनांक १९ मार्च २००५ चे शासन निर्णयात बदल करून प्रतिपुर्तीच्या अनुज्ञेयतेची कमाल मर्यादा रू.४००००/- वरून रू.१०००००/- पर्यत वाढविण्यात आलेली असून सदर प्रतिपुर्तीस मंजुरीचे अधिकार संबंधीत विभाग प्रमुखांना देण्यात आलेले आहेत व रू.१०००००/- पेक्षा जास्त वैदयकिय खर्चाच्या प्रतिपुर्तीचे प्रकरणांना महाराष्ट्र राज्य सेवा (वैदयकिय देखभाल)नियम १९६१ व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयामधील तरतुदीच्या अधिन राहुन मंजुरी देण्याचे अथवा उचित निर्णय घेण्याचे पुर्ण अधिकार संबंधीत मंत्रालयीन प्रशासकीय विभाग प्रमुखांना देण्यात आलेले आहेत.

सदरचे शासन निर्णयानुसार महापालिकेमध्ये कायम कर्मचा-यांचे रू.१०००००/- पर्यतचे व एक लाखापेक्षा जास्त वैदयकिय खर्चाचे परतावा देयक मंजुर करणे बाबतचा प्रस्ताव मा.महासभा,अहमदनगर महानगरपालिका यांचे समोर मान्यते करीता सादर करण्यात आला असता मा.महासभेने दिनांक २६/५/२०१२ रोजी खालील प्रमाणे ठराव पारित केलेला आहे.

" ऑफिस रिपोर्ट व सभागृहातील चर्चा पहाता रक्कम रू.एक लाखापर्यत कायम कर्मचा-यांना वैदयकिय खर्चाची प्रतिपुर्ती देणे बाबत मा.आयुक्त, अहमदनगर महानगरपालिका यांनी कार्यवाही करावी तसेच रक्कम रूपये एक लाखापेक्षा जास्त वैदयकिय खर्चाच्या प्रतिपुर्ती देणे बाबत ऑफिस

रिपोर्ट मध्ये नमुद असलेल्या कर्मचा-यांची वैदयकिय प्रतिपुर्ती यादी बाबत कार्यवाही करणेस मंजूरी देण्यात येत आहे.तसेच असे देखील ठरविण्यात येते की, एक लाख रकमेच्या पुढील कर्मचा-याच्या आरोग्य प्रतिपुर्ती बाबत प्रकरण तपासुन मा.आयुक्त, यांनी महासभेच्या मंजुरीसाठी ठेवण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.नियमानुसार पुढील उचित कार्यवाही करावी."

त्यानुसार अहमदनगर महानगरपालिकेमधील कर्मचा-यांना वैदयकिय खर्चाची प्रतिपुर्ती देयके संबंधीत विभाग प्रमुख यांचे मार्फत सादर केलेली आहेत. सदरची देयके मुख्य वैदयकिय अधिकारी कै.बा.दे. दवाखाना,यांनी सदरच्या देयकामधील आजाराची पडताळणी केलेली असुन संबंधीत आजार शासन विर्निदिष्ठ यादीत समाविष्ट आहेत असे कळविले आहे.परंतु सदरच्या कर्मचा-यांनी दाखल केलेली बिले हे शासनाने ठरवून दिलेल्या दवाखान्या व्यतिरीक्त आहे. असे कळविले आहे.

वैदयकिय खर्चाची प्रतिपुर्ती योजना देयके अदा करणेसाठी सन२०१६-१७ या आर्थिक वर्षामध्ये रू.६०,००,०००/- (रुपये साठ लाख) इतकी तरतुद केलेली आहे. सदर योजने अंतर्गत खालील तक्त्यामधील एकुण १ कर्मचा-यांनी वैदयकिय परतावा देयके सादर केलेली असुन त्याची एकूण रक्कम रू.१,४८,००९/- इतकी होत आहे.

| अ.क्र. | कर्मचा-यांची नाव | हुददा | रूग्णाचे नांव व कर्मचा-याशी नाते | मा.शासन निर्णयातील आजार क्र | आजाराचे स्वरूप | मागणी रक्कम | देय रक्कम ९०% |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | श्री.पाटिलबा रावजी खेमनर | लिपीक | सौ.शकुंतला पाटिलबा खेमनर पत्नी | ०१ | पल्मनरी इर्मजन्सी | १,६४,४५५/- | १,४८,००९/- |
| | | | | | | **एकुण** | **१,४८,००९/-** |

मा.शासनाचे दिनांक १६ नोव्हेंबर २०११ चे शासन निर्णयानुसार रूपये एक लाखापर्यतचे वैदयकिय खर्चाचा परतावा देयके मंजूर करणे बाबतचे अधिकार संबंधित विभाग प्रमुखांना देण्यात आलेले आहे. तसेच १ लाखाचे पुढील रक्कमेचे वैदयकिय खर्च परतावा देयके मंजूर करणेचे अधिकार संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभाग प्रमुखांना देण्यात आलेले आहे. सदर बाबत रुपये १ लाखाचे पुढील वैद्यकीय खर्च परतावा देयके मंजूर करणे बाबतचा प्रस्ताव मा.महासभेपुढे सादर करणेत आला होता. त्यानुसार मा.महासभेच्या दिनांक २६/५/२०१२ रोजीच्या ठरावानुसार रूपये १ लाखाचे पुढील वैदयकिय खर्चाचे प्रतिपुर्ती देणे बाबत मा.महासभेमार्फत अदा करणे बाबत ठराव मंजूर झालेला आहे.

तरी सदर वैदयकिय खर्च देयकाची रक्कम रू.१/- इतकी आहे. व सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाकरीता वैदयकिय खर्च देयकापोटी रूपये ६०,००,०००/- इतकी तरतूद मंजूर केलेली आहे. तसेच सदर देयकांची मुख्य लेखा परिक्षक यांचेकडुन तपासणी केलेली असुन वैद्यकीय खर्च प्रतीपुर्ती रक्कम ही १ लाखा पेक्षा जास्त असल्याने उपरोक्त दिनांक २६/०५/२०१२ रोजीचे मा.महासभेच्या ठरावा नुसार सदर रक्कम संबंधितास अदा करणेकामी सदर देयके मा.महासभेच्या निर्णयास्तव सादर करणेस रिपोर्ट मंजुरीस्तव आदेशार्थ सादर.

बजेट तरतुद :- ६०,००,०००/-
आतापर्यंत झालेला खर्च :- १,०१,६०८/-
शिल्लक तरतुद :- ५८,९८,३९२/-

यावर सहाय्यक आयुक्त श्री.साबळे यांची स्वाक्षरी असे.

यावर मा.उपायुक्त (सा) श्री.चारठाणकर साो यांची स्वाक्षरी असे.

यावर मा.अति.आयुक्त श्री.वालगुडे साहेब यांचा अभिप्राय की, अ नुसार प्रस्ताव मा.महासभेकडे सादर करावा.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक : १९/३** **दिनांक : १९ / ११ /२०१६.**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेतील कर्मचा-यांच्या रुपये एक लाखापेक्षा जास्त वैद्यकीय खर्चाच्या प्रतीपुर्ती देयकाबाबत.. (३) श्री.संजिव किसन चव्हाण, मेहेतर कामगार यांचे वैद्यकीय प्रतीपुर्ती बाबत

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

विनंती रिपोर्ट सादर करण्यात येतो कि, मा.महाराष्ट्र शासन,सार्वजनीक, आरोग्य विभाग,शासन निर्णय क्र.एम एजी २००५/९/ प्र.क्रं.१, आरोग्य ३,मंत्रालय,मुंबई दि.१९ मार्च २००५ अन्वये शासकीय कर्मचा-यांनी व त्यांच्या कुटूंबीयांनी आकस्मिक शासकीय निकडीच्या प्रसंगी घेतलेल्या खाजगी रूग्णालयातील अंतररूग्ण उपचाराच्या वैदयकिय खर्चाच्या प्रतिपूर्ती मंजूर करण्यांत आलेली आहे.

त्या अनुषंगाने अहमदनगर महानगरपालिकेमधील कर्मचा-यांना वैदयकीय खर्चाची प्रतिपुर्ती योजना लागु करण्यांस मा.महासभा ठराव क्रमांक २ दि.३/११/२००७ अन्वये ठराव पारित करण्यांत आलेला आहे. त्यानुसार जा.क्र.आस्था.३५१ दि.२९/४/२००८अन्वये कार्यालयीन परिपत्रकानुसार कर्मचा-यांना वैदयकिय खर्चाची प्रतीपुर्ती योजना दि.१/४/२००८ पासुन लागू करण्यांत आलेली आहे.

तदनंतर मा. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांक वैखप्र २०११/ प्र.क्र.३३३ /११/ राकवि २, मंत्रालय,मुंबई दिनांक १६ नोव्हेंबर २०११ अन्वये दिनांक १९ मार्च २००५ चे शासन निर्णयात बदल करून प्रतिपुर्तीच्या अनुज्ञेयतेची कमाल मर्यादा रू.४००००/- वरून रू.१०००००/- पर्यत वाढविण्यात आलेली असून सदर प्रतिपुर्तीस मंजुरीचे अधिकार संबंधीत विभाग प्रमुखांना देण्यात आलेले आहेत व रू.१०००००/- पेक्षा जास्त वैदयकिय खर्चाच्या प्रतिपुर्तीचे प्रकरणांना महाराष्ट्र राज्य सेवा (वैदयकिय देखभाल)नियम १९६१ व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयामधील तरतुदीच्या अधिन राहुन मंजुरी देण्याचे अथवा उचित निर्णय घेण्याचे पुर्ण अधिकार संबंधीत मंत्रालयीन प्रशासकीय विभाग प्रमुखांना देण्यात आलेले आहेत.

सदरचे शासन निर्णयानुसार महापालिकेमध्ये कायम कर्मचा-यांचे रू.१०००००/- पर्यतचे व एक लाखापेक्षा जास्त वैदयकिय खर्चाचे परतावा देयक मंजुर करणे बाबतचा प्रस्ताव मा.महासभा,अहमदनगर महानगरपालिका यांचे समोर मान्यते करीता सादर करण्यात आला असता मा.महासभेने दिनांक २६/५/२०१२ रोजी खालील प्रमाणे ठराव पारित केलेला आहे.

" ऑफिस रिपोर्ट व सभागृहातील चर्चा पहाता रक्कम रू.एक लाखापर्यत कायम कर्मचा-यांना वैदयकिय खर्चाची प्रतिपुर्ती देणे बाबत मा.आयुक्त, अहमदनगर महानगरपालिका यांनी कार्यवाही करावी तसेच रक्कम रूपये एक लाखापेक्षा जास्त वैदयकिय खर्चाच्या प्रतिपुर्ती देणे बाबत ऑफिस रिपोर्ट मध्ये नमुद असलेल्या कर्मचा-यांची वैदयकिय प्रतिपुर्ती यादी बाबत कार्यवाही करणेस मंजूरी देण्यात येत आहे.तसेच असे देखील ठरविण्यात येते की, एक लाख रकमेच्या पुढील कर्मचा-याच्या आरोग्य प्रतिपुर्ती बाबत प्रकरण तपासुन मा.आयुक्त, यांनी महासभेच्या मंजुरीसाठी ठेवण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.नियमानुसार पुढील उचित कार्यवाही करावी."

त्यानुसार अहमदनगर महानगरपालिकेमधील कर्मचा-यांना वैदयकिय खर्चाची प्रतिपुर्ती देयके संबंधीत विभाग प्रमुख यांचे मार्फत सादर केलेली आहेत. सदरची देयके मुख्य वैदयकिय अधिकारी

कै.बा.दे. दवाखाना,यांनी सदरच्या देयकामधील आजाराची पडताळणी केलेली असुन संबंधीत आजार शासन विर्निदिष्ठ यादीत समाविष्ट आहेत असे कळविले आहे.परंतु सदरच्या कर्मचा-यांनी दाखल केलेली बिले हे शासनाने ठरवून दिलेल्या दवाखान्या व्यतिरीक्त आहे. असे कळविले आहे.

वैदयकिय खर्चाची प्रतिपुर्ती योजना देयके अदा करणेसाठी सन२०१६-१७ या वर्षामध्ये रू.६०,००,०००/- (अक्षरी रुपये साठ लाख) इतकी तरतुद केलेली आहे. सदर योजने अंतर्गत खालील तक्त्यातील कर्मचा-यांनी वैदयकिय खर्च परतावा देयक सादर केलेली असुन त्याची एकूण रक्कम रू.१,०५,७१८/- इतकी होत आहे.

| अ.क्र. | कर्मचा-यांची नाव | हुददा | रूग्णाचे नांव व कर्मचा-याशी नाते | मा.शासन निर्णयातील आजार क्र | आजाराचे स्वरूप | मागणी रक्कम | देय रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | श्री.संजिव किसन चव्हाण | मे.का. | स्वतः | २३ | स्पा.कॉ.ई झिसिज | १,१७,४६५ | १,०५,७१८/- |
| | | | | | | **एकुण** | **१,०५,७१८/-** |

मा.शासनाचे दिनांक १६ नोव्हेंबर २०११ चे शासन निर्णयानुसार रूपये एक लाखापर्यतचे वैदयकिय खर्चाचा परतावा देयके मंजूर करणे बाबतचे अधिकार संबंधित विभाग प्रमुखांना देण्यात आलेले आहे. तसेच एक लाखाच्या पुढील वैदयकिय खर्चाचा परतावा देयके मंजूर करण्याचे अधिकार संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभाग प्रमुखांना देण्यात आलेले आहे. सदर बाबत रुपये एक लाखाचे पुढील वैद्यकीय खर्च परतावा देयके मंजूर करणे बाबतचा प्रस्ताव मा.महासभेपुढे सादर करणेत आला होता. त्यानुसार मा.महासभेच्या दिनांक २६/५/२०१२ रोजीच्या ठरावानुसार रूपये एक लाखाचे पुढील वैदयकिय खर्चाचे प्रतिपुर्ती देणे बाबत मा.महासभेमार्फत अदा करणे बाबत ठराव मंजूर झालेला आहे.

तरी सदर वैदयकिय खर्च देयकाची रक्कम रू.१/- इतकी आहे. व सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाकरीता वैदयकिय खर्च देयकापोटी रूपये ६०,००,०००/- इतकी तरतूद मंजूर केलेली आहे. तसेच सदर देचकांची मुख्य लेखा परिक्षक यांचेकडुन तपासणी केलेली असुन वैद्यकीय खर्च प्रतीपुर्ती रक्कम ही एक लाखा पेक्षा जास्त असल्याने उपरोक्त दिनांक २६/०५/२०१२ रोजीचे मा.महासभेच्या ठरावा नुसार सदर रक्कम संबंधितास अदा करणेकामी सदर देयके मा.महासभेच्या निर्णयास्तव सादर करणेस रिपोर्ट मंजुरीस्तव आदेशार्थ सादर.

बजेट तरतुद :- ६०,००,०००/-

आतापर्यंत झालेला खर्च :- १,०१,६०८/-

शिल्लक तरतुद :- ५८,९८,३९२/-

यावर सहाय्यक आयुक्त श्री.साबळे यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

यावर मुख्यलेखापरिक्षक श्री.अनारसे यांचा अभिप्राय की, आस्थापना प्रमुख यांचे अभिप्रायाप्रमाणे महासभा ठराव क्र. २ दि. २६/०५/२०१२ चे ठरावानुसार वैद्यकीय प्रतिपूर्ती देयक महासभेपुढे ठेवणे आवश्यक ठरेल.

यावर मा.उपायुक्त श्री.चारठाणकर साो यांचा अभिप्राय की, महासभेपुढे सादर करणे योग्य.

यावर मा.आयुक्त श्री.गावडे साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी असे.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक : २०** **दिनांक : १९ / ११ /२०१६.**

---

**प्रस्तावाचा विषय :-** शासकीय कर्मचा-यांच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीच्या मंजुरीबाबत प्रतिपूर्तीच्या अनुज्ञेयतेची कमाल मर्यादा व मंजुरीच्या अधिकारांबाबत सुधारणा.. संदर्भ - मा.शासन सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्रमांक वैखप्र २०१६/प्र.क्र.१६/२०१६/राकावि-२ दिनांक १६ मार्च २०१६.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ :- मा. शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्रमांक : वैखप्र-२०१६/प्र. क्र. १६/२०१६/राकावि-२ दिनांक १६ मार्च, २०१६

मा.शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी दिनांक १६ मार्च, २०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार "शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र. वैखप्र-२०११/ प्र.क्र.३३३/११/राकावि-२, दि. १६ नोव्हेंबर,२०११ मध्ये प्रतिपुर्ती अनुज्ञेयतेची कमाल मर्यादा व मंजुरीचे अधिकारांबाबत खालील प्रमाणे सुधारणा करण्याचा निर्णय घेतला आहे.

१) महाराष्ट्र राज्य सेवा ( वैद्यकीय देखभाल ) नियम, १९६१ व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयामधील तरतुदीच्या अधीन राहुन रु. ३.००,०००/- ( आक्षरी रुपये- तीन लाख फ़क्त) पर्यंतच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीस मंजूरीचे अधिकार संबंधित विभागांच्या विभाग प्रमुखांना प्रदान करण्यात येत आहेत.

२) रु. ३.००,०००/- ( आक्षरी रुपये- तीन लाख फ़क्त ) वरील वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीच्या प्रकरणांना महाराष्ट्र राज्य सेवा ( वैद्यकीय देखभाल ) नियम,१९६१ व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयामधील तरतुदींच्या अधीन राहुन मंजुरी देण्याचे अथवा उचित निर्णय घेण्याचे पुर्ण अधिकार संबंधीत मंत्रालयीन प्रशासकीय विभाग प्रमुखांना देण्यात येत आहेत.

२. या शासनव्दारे असे निर्देश देत आहे की, वर नमुद केल्याप्रमाणे विभागप्रमुख व प्रशासकीय विभागप्रमुख या स्तरावर प्रकरणांना मंजुरी देताना महाराष्ट्र राज्य सेवा ( वैद्यकीय देखभाल ) नियम,१९६१ व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयामधील तरतुदी काटेकोरपणे तपासुन मंजुरी देण्यात यावी.

३. हा शासन निर्णय प्रंलबित प्रकरणांना देखील लागु करण्यात यावा.

सदर बाबत सविस्तर अहवाल सादर करण्यात येतो की,अहमदनगर महानगरपालिकेमधील कर्मचा-याना वैद्यकिय खर्चाची प्रतिपुर्ती योजना लागु करण्यांस मा.महासभा ठराव क्रमांक २ दिनांक ०३-११-२००७ अन्वये ठराव पारित करण्यांत आलेला आहे. त्यानुसार जा.क्र.आस्था. ३५१ दिनांक २९-०४-२००८ अन्वये कार्यालयीन परिपत्रकानुसार कर्मचा-यांना वैद्यकिय खर्चाची प्रतिपुर्ती योजना दि. ०१-०४-२००८ पासुन लागू करण्यांत आलेली आहे.

तद्नंतर मा.महाराष्ट्र शासन,सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांक वैखप्र २०११/प्र.क्र.३३३/ ११ / राकावि २,मंत्रालय, मुंबई दि.१६ नोव्हेंबर २०११ अन्वये दि.१९ मार्च २००५ चे शासन निर्णयात बदल करून प्रतिपुर्तीच्या अनुज्ञेयतेची कमाल मर्यादा रू.४००००/- वरून रू.१०००००/- पर्यंत वाढविण्यात आलेली असुन सदर प्रतिपुर्तीस मंजुरीचे अधिकार संबधीत विभाग प्रमुखांना देण्यात आलेले आहेत व रू.१,००,०००/- पेक्षा जास्त वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीचे प्रकरणांना महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकिय

देखभाल) नियम १९६१ व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयामधील तरतुदीच्या अधिन राहुन मंजुरी देण्याचे अथवा उचित निर्णय घेण्याचे पुर्ण अधिकार संबधीत मंत्रालयीन प्रशासकीय विभाग प्रमुखांना देण्यात आलेले आहेत.

सदरचे शासन निर्णयानुसार महापालिकेमध्ये कायम कर्मचा-यांचे रू.१,००,०००/- पर्यंतचे व १,००,०००/- पेक्षा जास्त वैद्यकिय खर्चाचे परतावा देयक मंजुर करणे बाबतचा प्रस्ताव मा. महासभा, अहमदनगर महानगरपालिका यांचे समोर मान्यते करीता सादर करण्यात आला असता मा. महासभेने ठराव क्र.९ दिनांक २६-५-२०१२ नुसार रोजी खालील प्रमाणे ठराव पारित केलेला आहे.

" ऑफिस रिपोर्ट व सभागृहातील चर्चा पहाता रक्कम रू. एक लाखापर्यंत कायम कर्मचा-यांना वैद्यकीय खर्चाची प्रतिपुर्ती देणे बाबत मा. आयुक्त, अहमदनगर महानगरपालिका यांनी कार्यवाही करावी तसेच रक्कम रूपये एक लाखापेक्षा जास्त वैद्यकिय खर्चाच्या प्रतिपुर्ती देणे बाबत ऑफीस रिपोर्ट मध्ये नमुद असलेल्या कर्मचा-यांची वैद्यकीय प्रतिपुर्ती यादी बाबत कार्यवाही करणेस मंजुरी देण्यात येत आहे. तसेच असे देखील ठरविण्यात येते की एक लाख रकमेच्या पुढील कर्मचा-यांच्या आरोग्य प्रतिपुर्ती बाबत प्रकरण तपासुन मा.आयुक्त, यांनी महासभेच्या मंजुरीसाठी ठेवण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी. नियमानुसार पुढील उचित कार्यवाही करावी."

सदर ठरावानुसार अहमदनगर महानगरपालिकेमधील कर्मचा-याना वैद्यकिय खर्चाची रु. १०००००/- पर्यंतची प्रतिपुर्ती देयके मा. आयुक्त साहेब यांच्या मान्यतेने अदा करण्यात येत आहेत. तसेच १,००,०००/- पेक्षा जास्त वैद्यकिय प्रतिपुर्ती देयके मा. महासभा, अहमदनगर महानगरपालिका यांची मान्यता घेवुन मा.आयुक्त साहेब यांचे मंजुरीने अदा करण्यात येत आहे.

तरी मा. शासन निर्णय दिनांक १६ मार्च, २०१६ नुसार महाराष्ट्र राज्य सेवा ( वैद्यकीय देखभाल ) नियम, १९६१ व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयामधील तरतुदीच्या अधीन राहुन रु. ३.००,०००/- ( आक्षरी रुपये- तीन लाख फ़क्त) पर्यंतच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्तीस मंजुरीचे अधिकार संबंधित विभागांच्या विभाग प्रमुखांना प्रदान करण्यात आलेले असल्याने मा. शासनाचे शासन निर्णयानुसार मा.महासभा ठराव क्र.९ दि. २६/५/२०१२ अन्वये केलेल्या ठरावात दुरुस्ती करुन रुपये १०००००/- एवजी रुपये ३०००००/- पर्यंतची वैद्यकीय खर्चाची परतावा देयक मा. आयुक्त यांचे मार्फ़त मंजुर करणे बाबत अधिकार प्रदान करणेस व रु. ३०००००/- चे वरील वैद्यकीय खर्चाची परतावा देयक मा. महासभेची पुर्व मान्यता घेऊन अदा करणे बाबत नविन ठराव पारित करणे आवश्यक असल्याने सदरचा प्रस्ताव मा. महासभेपुढे मंजुरीकरिता सविनय सादर.

यावर प्र.सहाय्यक आयुक्त श्री.साबळे यांचा अभिप्राय की, प्रस्तावानुसार मान्यतेस्तव सादर.

यावर लेखापरिक्षक श्री.अनारसे यांचा अभिप्राय की, विभागांनी प्रस्तावित केल्यानुसार शासन निर्णयाकरीता मा.महासभेसमोर ठेवणेस हरकत नाही.

यावर उपायुक्त श्री.चारठाणकर सा‍ो यांची सहमती दर्शक स्वाक्षरी असे.

यावर अति.आयुक्त श्री.वालगुडे सा‍ो यांचा अभिप्राय की, अ, नुसार प्रस्ताव मा.महासभेमध्ये सादर करावा.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक : २१** **दिनांक : १९ / ११ /२०१६.**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक ८ मधील नंदनवन कॉलनी येथील ओपन स्पेसला छत्रपती शिवाजी महाराज उद्यान असे नामकरण करणे बाबत मा.नगरसेविका सौ.उषा शिवाजीराव नलवडे यांचे दि.३०/०८/२०१६ चे पत्र.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

**संदर्भ :-** मा.नगरसेविका सौ.उषा शिवाजीराव नलवडे यांचेकडील दिनांक ३०/०८/२०१६ रोजीची यादी.

उपरोक्त विषयान्वये विनंती रिपोर्ट देण्यात येतो की, प्रभाग क्र.८ मधील नंदनवन कॉलनी येथील ओपन स्पेसला छत्रपती शिवाजी महाराज उद्यान असे नामकरण करणे बाबत मा.नगरसेविका सौ.उषा शिवाजीराव नलवडे यांनी संदर्भिय पत्रान्वये मागणी केलेली आहे. मा.नगरसेविका यांचे मागणीनुसार प्रभाग क्र.८ मधील नंदनवन कॉलनी येथे महानगरपालिकेच्या मालकीचा ओपन स्पेस असुन ओपन स्पेसमध्ये वयोवृध्द नागरीक फिरण्यासाठी तसेच लहान मुले खेळण्यासाठी येत असतात. या ओपन स्पेसला संरक्षक भिंत बांधलेली असुन ओपन स्पेसमध्ये अंतर्गत भागात जॉंगींग ट्रॅक व उद्यान तयार करण्यात आलेले आहे. सदर परिसरातील नागरीकांनी मा.नगरसेविका यांचेकडेस मागणी केलेली आहे. मा.नगरसेविका सौ.उषा शिवाजीराव नलवडे यांचे मागणीनुसार छत्रपती शिवाजी महाराज उद्यान असे नामकरण करणे बाबत कळविलेले आहे.

त्यानुसार अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील कोणत्याही सार्वजनिक रस्त्यास, चौकास, इमारतीस, भुखंडास अथवा सभागृहास नामकरण देण्याचे अधिकार मुंबई प्रांतिक महनगरपालिका अधिनियम १९४९ कलम ६३(९) अन्वये मा.महासभेस असल्याने प्रभाग क्र. ८ मधील नंदनवन कॉलनी येथील ओपन स्पेसला छत्रपती शिवाजी महाराज उद्यान असे नामकरण करण्याचा प्रस्ताव मा.महासभेकडे निर्णयास्तव पाठविणेस मंजुरी मिळणेस्तव रिपोर्ट स.सादर.

यावर नगररचनाकार श्री.राम पाटील यांचा अभिप्राय की, प्रस्तुत प्रकरण हे विद्यमान विकास कामाचे जागेस नामकरणाबाबत असून तो या विभागाशी संबंधित नसल्याने यापूर्वीचे नामकरणांचा विचार करुन पुढील उचित कार्यवाही करावी.

यावर उपायुक्त (कर) श्री.बेहेरे यांचा अभिप्राय की, प्रस्तावित नुसार विषय मान्यतेस्तव धोरणात्मक विषय असलेने मे.महासभेपुढे सादर करणेस हरकत नाही. मे.आदेशार्थ सादर.

यावर अतिरिक्त आयुक्त श्री.वालगुडे साो यांचा अभिप्राय की, सोबतच्या अहवालानुसार सदरचा विषय धोरणात्मक असल्यामुळे मा.महासभेकडे सादर करणेस हरकत नाही.

यावर मा.आयुक्त श्री.गावडे साो यांची सहमती दर्शक स्वाक्षरी असे.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक :- २२** **दिनांक : १९ /११/२०१६.**

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

**प्रस्तावाचा विषय :-** १४ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार अहमदनगर महानगरपालिकेस प्राप्त झालेल्या अनुदानामधून रक्कम रु.२५२.६१ लक्ष एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम अंतर्गत फेज-१, फेज-२ व डॉ.बाबासाहेब आंबेडकर श्रम साफल्य आवास योजना महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान जिल्हास्तर (रस्ते विकास) व महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान जिल्हास्तर (पाणी पुरवठा योजना) योजनेच्या मनपा हिश्यापोटी वर्ग करणे बाबत. संदर्भ :- मा.शासन निर्णय क्रमांक ८०१५/प्र.क्र.१०६/नवि-४ दिनांक ०३/०८/२०१५.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ- मा.शासन निर्णय क्रमांक:टिएफसी ८०१५/प्र.क्र.१०६/नवि-४ दिनांक ०३/०८/२०१५.

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये सादर करण्यात येते की, अहमदनगर महानगरपालिकेमार्फत खालील प्रमाणे शासकीय योजनांचे काम प्रगती पथावर पुर्णत्वाच्या मार्गावर आहेत.

| अ.क्र. | योजनेचे नांव | कामाची सद्यस्थिती |
|---|---|---|
| १ | एकात्मिक गृह निर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम फेज-१ | काम पुर्णत्वाच्या मार्गावर. |
| २ | एकात्मिक गृह निर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम फेज-२ | काम पुर्ण. |
| ३ | डॉ.बाबासाहेब आंबेडकर श्रम साफल्य योजना | काम पुर्ण. |

उपरोक्त तीनही योजनांकरीता महानगरपालिका हिश्याची उर्वरीत तरतुद करणे आवश्यक आहे. अहमदनगर महानगरपालिकेस १४ व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशी नुसार अद्यापपर्यंत एकुण रु. ३३,८१,११,१९६/- इतके अनुदान प्राप्त झाले आहे. याबाबत मा.शासन निर्णय क्रमांक टीएफसी ८०/प्र.क्र. १०६- नवि-४ दिनांक ०३/०८/२०१५ नुसार एकुण प्राप्त अनुदानाच्या ५० % निधी घनकचरा व्यवस्थापन व स्वच्छ महाराष्ट्र अभियान करीता राखीव आहे. उर्वरीत ५० % रक्कम मधुन इतर कामे प्रस्तावीत करता येतात. यामध्ये संदर्भीय शासन परिपत्रकानुसार पृष्ठ क्र. ४ मधील मुद्दा क्र. ड (२) मध्ये केंद्र व राज्य योजनांतर्गत मंजुर पायाभुत सुविधा प्रकल्पावरील लोकवर्गणी, महानगरपालिका / नगरपरिषदेचा हिस्सा व असे प्रकल्प पुर्ण करण्याकामी आवश्यक ठरणारा अतिरिक्त खर्च (जर प्रकल्प मान्यतेच्या प्रक्रियेत असेल तर अशा प्रकल्पाच्या बाबतीत लोक वर्गणीच्या हिश्शाची रक्कम राखुन ठेवता येईल. असे नमुद केले आहे.

त्यानुसार १४ व्या वित्त आयोगातील अद्यापर्यंत प्राप्त अनुदानापैकी घनकचरा व्यवस्थापन व शौचालय बांधणे बाबत ५० % राखीव निधी व्यतिरिक्त उर्वरीत ५० % निधी रक्कम रु. १६,९०,५५,५९८/- चा विनियोग अद्याप पर्यंत खालील प्रमाणे करण्यात आलेले आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | मुलभुत सुविधा निधी म. न.पा. हिश्शा पोटी वर्ग | रु. ५,०३,९४,३८९/- |
| २ | मुलभुत सुविधा निधी म. न.पा. हिश्शा पोटी वर्ग | रु. २,५६,००,०००/- |
| ३ | अमृत अभियान (पाणी पुरवठा) म. न.पा. हिस्सा | रु. ६,७८,००,०००/- |
| | एकुण | रु. १४,३७,९४,३८९/- |

त्यानुसार रु. १६,९०,५५,५९८/- पैकी रुपये २,५२,६१,२०९/- इतके शिल्लक आहे. एकात्मिक गृह निर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम फेज-१, फेज-२ व डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रम साफल्य आवास योजना अंतर्गत कामाचा तपशिल खालील प्रमाणे

अ) एकात्मिक गृह निर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम फेज-१ (नालेगांव स. नं. २२०,२२१ येथे २५२

घरांची घरकुल योजना

| | | |
|---|---|---|
| १ | एकुण प्रकल्पाची रक्कम रुपये | रु.९९६.३६ लक्ष |
| २ | मा.शासनाकडुन प्राप्त अनुदान | रु. ६९६.८१लक्ष |
| ३ | म. न.पा. हिश्यामधुन अद्याप पर्यंत देण्यात आलेली रक्कम | रु. १७१.६९ लक्ष |
| ४ | लाभार्थी हिस्सा रक्कम | रु. ३५ लक्ष |
| ५ | म. न.पा. हिश्यामधुन उर्वरीत देय असलेली रक्कम | रु. ९२.८६ लक्ष |

ब) एकात्मिक गृह निर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम फेज-२ (नालेगांव स. नं. ४१/२ येथे ३७२ घरांची घरकुल योजना

| | | |
|---|---|---|
| १ | एकुण प्रकल्पाची रक्कम रुपये | रु.१४५४.६० लक्ष |
| २ | मा.शासनाकडुन प्राप्त अनुदान | रु. ११५८.४२ लक्ष |
| ३ | म. न.पा. हिश्यामधुन अद्याप पर्यंत देण्यात आलेली रक्कम | रु. १८९.९९ लक्ष |
| ४ | लाभार्थी हिस्सा रक्कम | रु. ५७ लक्ष |
| ५ | म. न.पा. हिश्यामधुन उर्वरीत देय असलेली रक्कम | रु. ४९.१९ लक्ष |

क) डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रम साफल्य आवास योजना ( नालेगांव स. नं. २२० येथे म. न.पा.च्या सफाई कर्मचाऱ्याकरीता घरकुल योजना

| | | |
|---|---|---|
| १ | एकुण प्रकल्पाची रक्कम रुपये | रु. ५२४.६४ लक्ष |
| २ | मा.शासनाकडुन प्राप्त अनुदान | रु. ३४२.१२ लक्ष |
| ३ | म. न.पा. हिश्यामधुन अद्याप पर्यंत देण्यात आलेली रक्कम | रु. १४२.०४ लक्ष |
| ४ | म. न.पा. हिश्यामधुन उर्वरीत देय असलेली रक्कम | रु. ४०.४८ लक्ष |

त्यानुसार वरील तीनही योजनांकरीता म. न.पा. हिश्यामधुन खालील प्रमाणे रक्कम अदा करणे आवश्यक आहे.

अ) एकात्मिक गृह निर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम फेज-१ — रु. ९२.८६ लक्ष

ब) एकात्मिक गृह निर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम फेज-२ — रु. ४९.१९ लक्ष

क) डॉ.बाबासाहेब आंबेडकर श्रम साफल्य योजना — रु. ४०.४८ लक्ष

एकुण रु. १८२.५३ लक्ष

त्यानुसार वरील तीनही योजनांकरीता एकुण रु. १८२.५३ लक्ष म. न.पा. हिश्यापोटी जमा करणे आवश्यक आहे. एकात्मिक गृह निर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम फेज-१ व एकात्मिक गृह निर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम फेज-२ , डॉ.बाबासाहेब आंबेडकर श्रम साफल्य योजनाची कामे पुर्ण झाली असुन लाभार्थींच्या सदनिका खरेदी देणे बाबत कार्यवाही चालु आहे.

सदर बाबत वरील तीन योजनांकरीता उर्वरीत म. न.पा. हिश्यापोटी रक्कम १४ व्या वित्त आयोगाच्या प्राप्त निधी मधुन तरतुद करणे करीता प्रस्ताव मान्यतेस्तव मा.महासभेकडेस सादर करणे आवश्यक आहे. तरी वरील तीन योजनांकरीता म. न.पा. हिश्याची १४ व्या वित्त आयोगातील प्राप्त अनुदानामधुन एकुण रककम रुपये १८२.५३ लक्ष तरतुद करणे करीता प्रस्ताव मा. महासभेकडेस सादर करणे करीता सविनय सादर.

यावर शहर अभियंता श्री.सोनटक्के यांचा अभिप्राय की, अहवालानुसार सदरचा प्रस्ताव मा.महासभेपुढे सादर करणेस मान्यतेस सादर.

यावर मा.मुख्यलेखाधिकारी श्री.झिरपे यांचा अभिप्राय की, प्रस्तावित केलेल्या रक्कमेवर शिल्लक उर्वरीत रक्कम महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान (जिल्हास्तर) खाती वर्ग करणे योग्य होईल जेणेकरुन प्राप्त झालेली देयके पुर्णपणे अदा करता येतील व उपयोगी प्रमाणपत्र सादर करुन पुढील निधी शासनाकडुन प्राप्त करुन घेता येतील.

यावर मा.उपायुक्त (कर) श्री.बेहेरे सो यांचा अभिप्राय की, विभागाने प्रस्तावित केलेनूसार मनपास १४ वा वित्त आयोगाच्या शिफारशीनूसार प्राप्त रक्कमेपैकी ५०% रक्कम घनकचरा व्यवस्थापनासाठी व ५०% रक्कम इतर विकास कामासाठी खर्च करणे आवश्यक आहे. सद्यस्थितीत इतर विकास कामांसाठीची शिल्लक रक्कम रु.२५२.६१ लक्ष शिल्लक असुन तिचे नियोजन आवश्यक आहे. करीता

(१) घरकुल योजना फेज-१ (२५२) घरे = रु. ९२.८६ लक्ष
(२) घरकुल योजना फेज -२ (३७२ घरे) = रु.४९.१९ लक्ष
(३) श्रमसाफल्य आवास योजना (११३ घरे ) = रु.४०.४२ लक्ष
(४) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान (जिल्हास्तर) योजना रस्ते विकास = रु.४०.०० लक्ष
(५) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान (जिल्हास्तर) पा.पु.योजना = रु.२५.०० लक्ष
(६) पिंपळगाव माळवी येथे मोकाट कुत्र्यांसाठी निवारा बांधणे, कंम्पौंड वॉल दुरुस्ती, पाणी टाकी इ. योजना करणेसाठी = रु.५.०० लक्ष

**एकुण रु. २५२.६१ लक्ष.**

शासन निर्णय दिनांक ०३/०८/२०१५ नूसार १४ वा वित्त आयोगांतर्गत प्राप्त रक्कमेतून करावयाच्या कामांस आयुक्त प्रशासकीय मान्यता देण्यास सक्षम आहेत परंतू त्यास मनपा महासभेची मान्यता आववश्यक आहे. करीता मे सादर.

यावर मा.अतिरिक्त आयुक्त श्री.विलास वालगुडे सो यांचा अभिप्राय की, सोबतच्या अहवालानुसार व उपायुक्त (कर) यांनी अनु.क्र.४,५ व ६ प्रमाणे नमूद केलेल्या कामासह एकुण रक्कम रु. २५२.६१ लक्ष साठी शासन निर्णय दि.०३/०८/२०१५ अन्वये मुद्दा क्र.III १४ व्या वित्त आयोगाच्या निधीच्या विनियोगाची कार्यपध्दती मध्ये नमूद प्रशासकीय मंजूरीची कार्यपध्दती अनुसरणे जरुरीचे आहे. तथापि मान्यतेस्तव प्रस्ताव मा.महासभेकडे सादर करणेस हरकत नाही.

यावर मा.आयुक्त श्री.गावडे साहेब यांचा अभिप्राय की, कृपया मु.ले.प. यांनी स्वयंस्पष्ट अभिप्राय नोंदवावेत.

यावर मुख्यलेखापरिक्षक श्री.अनारसे साो यांचा अभिप्राय की, १४ व्या वित्त आयोगानुसार प्राप्त अनुदान हे मुलभूत अनुदान आहे की कार्यात्मक अनुदान आहे ? खुलासा करावा.

यावर प्रकल्प अभियंता, यांचेकडुन मा.सादर की, १४ व्या वित्त आयोग अंतर्गत प्राप्त अनुदान हे मुलभुत अनुदान अंतर्गत मनपास प्राप्त झाले आहे.

यावर मुख्यलेखापरिक्षक श्री.अनारसे साो यांचा अभिप्राय की, म.शा.न.वि.वि.शासन निर्णय क्र.टी.एफ.सी.८०१५/प्र.क्र.१०६/नवि-४ दि.०३/०८/२०१५ मधील परि.क्र.(ii)(i) क ड मधील तरतूदीनुसार कार्यवाहीस हरकत नाही. परि.क्र.(iii) २) अन्वये मा.महासभेची मान्यता घेणे आवश्यक ठरते.

यावर मा.आयुक्त श्री गावडे साहेब यांचा अभिप्राय की, शासन निर्णयानुसार उपलब्ध निधीचा विनियोग करणे उचित राहील.

**चर्चा -**

**मा.श्री.संजय शेंडगे :-** दुखवटयाचे प्रस्ताव घ्या.

**मा.श्री.कैलास गिरवले :-** बँकांच्या लाईनमध्ये मृत्यू पावलेल्या ३९ व्यक्ती

**मा.श्री.संजय घुले :-** शरीफाबी सय्यद राजा

**मा.श्री.अनिल शिंदे :-** या सभागृहाचे सन्माननीय सदस्य यांना एकत्र करुन बोलण्याची संधी द्यावी.

**मा.श्री.संजय घुले :-** दिनांक १९/१०/२०१६ रोजीची मागील सभा का रद्द झाली ते परिपत्रक वाचुन दाखवा गेल्या वेळेस आचारसंहिता लागली होती त्यामुळे २ विषय घेतले व धोरणात्मक विषय स्थगीत ठेवण्यात आले. आजच्या सभेत विषय क्रमांक २०,२१,२२ स्थगीत ठेवायचे आहेत.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** आयुक्त साहेब काय परिपत्रक आहे ते वाचुन दाखवा.

मा.श्री.दिप चव्हाण :- महापौर साहेब मागची सभा तहकूब का विषय तहकुब.

मा.महापौर साहेब :- दुखवटयाचा प्रस्ताव व रजेचे अर्ज घेतले १७ ते २२ विषय स्थगीत केले होते विषय क्रमांक १७ व १८ वर चर्चा होणार आहे.

मा.श्री.दिलीप सातपुते :- इलेक्ट्रीक विभाग प्रमुख यांनी सतत माईक बंद पडतात याबाबत सभागृहाला खुलासा करावा.

इलेक्ट्रीक विभाग प्रमुख यांनी खुलासा केला.

नगरसचिव :- मा.राज्य निवडणुक आयोगाच्या आचारसंहिता परिपत्रकाचे वाचन केले.

मा.श्री.संजय घुले :- मागे सभा रद्द केली असतांना आता सभा का काढली.

मा.श्री.अभिषेक कळमकर :- आचार संहितेचे पत्र किती तारखेला आले.

नगरसचिव श्री.तडवी :- दिनांक १७/१०/२०१६ रोजी आचारसंहितेचे पत्र आले.

मा.श्री.अभिषेक कळमकर :- अजेंडा केंव्हा काढला.

नगरसचिव श्री.तडवी :- दिनांक १०/१०/२०१६ रोजी सन्माननीय सदस्यांचे घरी अजेंडा पोहोच केलेला आहे.

मा.श्री.संजय घुले :- नाशिक विभागीय आयुक्त साहेब यांचे पत्रान्वये महापौरांनी विरोधी पक्ष नेत्याची नेमणूक केली त्याबाबतचा अहवाल आपणास सादर करणे बाबत लेखी दिले. त्या पत्रावर कारण काय दिले याचा खुलासा करण्यांत यावा.

मा.महापौर साहेब :- त्यात मुदत नाही आता करणारच आहोत विरोधी पक्ष नेते पदाची निवड.

मा.श्री.अभय आगरकर :- सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारले अॅक्ट मध्ये प्रश्न उपस्थित करावयाचे असतील तर १५ मिनिटे वेळ दिला जातो. सभागृहामध्ये चर्चेसाठी घ्यावा अशी विनंती करावयाची. ऐनवेळी प्रश्न सदस्य विचारु शकतो पण त्याला उत्तर द्यायचे किंवा नाही हा आमचा अधिकार आहे. सन्माननीय सदस्यांना विनंती आपण सुध्दा सभागृह चालवतो ऐनवेळी प्रश्न विचारतात ही पध्दत आपण बदलू सकारात्मक सुरुवात करु.

मा.श्री.कैलास गिरवले :- आगरकर साहेबांनी मांडलेला मुद्दा योग्य ऐनवेळी काही मुद्दे चर्चेला घ्यावे लागतात. मा.महापौराचा अधिकार आहे प्रश्नाला उत्तर द्यायचे किंवा नाही. पण मा.आयुक्त यांनी हस्तक्षेप करुन उत्तर द्यावे.

मा.श्री.अभय आगरकर :- जोपर्यंत महापौर आदेश आयुक्तांना करीत नाहीत तोपर्यंत आयुक्त उत्तर देवू शकत नाही.

मा.श्री.कैलास गिरवले विभागीय आयुक्तांनी जे पत्र आपणाला दिले त्याचा खुलासा आपण केला का नाही.

मा.श्री.दिप चव्हाण :- सदरची सभाही तहकुब सभा आहे. ॲक्ट मध्ये प्रकरण २ पान नंबर ५८४ वर तरतुद आहे. आता जो प्रश्न उपस्थित केला त्याचे २ मिनीटात खुलासा करावा.

मा.आयुक्त श्री.गावडे साहेब :- अशा प्रकारचे विभागीय आयुक्तांकडून पत्र प्राप्त झाले. संबंधीत नगरसचिव विभागाकडे पाठविले विभागीय आयुक्तांकडे उचीत कार्यवाहीसाठी उत्तर पाठविण्यात येईल.

मा.श्री.अनिल शिंदे :- घुले साहेबांचे प्रश्नाचा खुलासा आयुक्त साहेबांनी केला आपण दिप चव्हाण यांना बोलण्याची संध्दी द्यावी.

मा.श्री.संजय घुले :- किती कालावधी याचा उल्लेख आहे का ?

मा.आयुक्त श्री.गावडे साहेब :- मी सभागृहाला सांगीतले नगरसचिव विभागाकडून उपायुक्तां मार्फत अहवाल मा.विभागीय आयुक्त, नाशिक विभाग नाशिक यांना पाठविण्यांत येईल.

मा.उपायुक्त श्री.चारठाणकर :- मा.विभागीय आयुक्तांकडून पत्र प्राप्त झाले आहे. खुलासा तयार करण्याचे काम प्रगती पथावर आहे. येत्या तीन-चार दिवसात अहवाल सादर केला जाईल.

मा.सौ.रुपाली वारे :- कालच्या लोकमत पेपरमध्ये बातमी आली अधिकृत धार्मिक स्थळाबाबत त्यावर चर्चा करण्यांत यावी.

मा.आयुक्त श्री.गावडे साहेब :- मा.उच्च न्यायालयाचे गृहविकास व नगर विकास विभाग यांनी परिपत्रक काढले दोन्ही परिपत्रक सर्व सदस्यांना तर विभागाने पाठविले त्यानुसार सर्व सदस्यांनी त्याचे पालन करावे.

मा.श्री.कुमार वाकळे :- जो सर्व्हे झाला तो चुकीचा आहे. महापौर अभिषेक कळमकर यांनी फेर सर्व्हेची मागणी केली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या गाईड लाईन प्रमाणे झालेला नाही. त्यामुळे फेरसर्व्हे करावा. मा.न्यायालयाच्या आदेशाच्या विरोधात नाही. त्यांनी सर्व्हे केला त्यांना स्टेजवर बोलवा.

मा.श्री.कैलास गिरवले :- आपल्या लोकांनी सर्व्हे करतांना कशा पध्दतीने केला २००९ हे कशाच्या आधारे ठरवला. आयुष्यमान कसे ठरवले.

मा.सौ.मनिषा बारस्कर :- २००९ आदर्श कॉलनीतील मंदिर कसे काय आले. सावेडी गावातले काही मंदिर १०० वर्षा पुर्वीचे आहे तरी सुध्दा त्यांची नावे आली खुलासा करावा.

नगरचनाकार श्री.पाटील :- सर्व्हेक्षण करतांना मोठया प्रमाणात उणिवा आहेत. लोकांनी पुरावा देणे अपेक्षित होते. जागेवर गेल्यानंतर कोणी पुरावा देण्यासाठी पुढे आले नाही.

मा.श्री.सुनिल कोतकर :- मंदिरांची यादी वाचुन दाखवा.

मा.श्री.दिप चव्हाण :- पहिली नोटीस कधी दिली. कोणती मंदिरे कोणत्या स्लॅब मध्ये येतात. नवा मराठात नोटीस दिलेली आहे.

नगररचनाकार श्री.पाटील :- १०% लोक आले. जे आले त्यांनी सक्षम पुरावे आणले. नाही तरी आपण पुरावा देण्यासाठी पुरेसावेळ देतांना नवामराठा व नगरटाईम्स मध्ये नोटीस दिली.

मा.श्री.सचिन जाधव :- वॉर्ड ऑफिसर किंवा त्याठिकाणाचे अधिकारी यांनी समक्ष स्थळ पाहणी करणे अपेक्षित होते. काही ठिकाणी ट्रस्ट स्थापन झाले नाही. काही ठिकाणी १०० वर्षापूर्वी चे मंदिरात लोक दर्शनासाठी जातात. महानगरपालिकेचे वेळोवेळी सर्व्हेक्षण केले जाते ते तपासणे महत्वाचे परत रिव्हीजन घेवून कारवाई करावी.

मा.श्री.संजय घुले :- सर्व्हे केलेला आहे. ते मंदिर वगळून पुर्ण सर्व्हेक्षण केले पाहिजे नगरपरिषद असतांना सर्व्हेक्षण झालेले आहे. पुन्हा सर्व्हेक्षण झाले पाहिजे असे सभागृहाला सांगतो.

मा.श्री.अभय आगरकर :- सदस्यांच्या भावना तिव्र आहे. वस्तूस्थिती नाकारुन चालणार नाही. सर्व्हे मधील उणीवा त्रुटी भरुन काढता येवू शकती. पूर्ण सर्व्हेक्षण आपण करु शकतो काय ?

मा.श्री.कुमार वाकळे :- जे मंदिर कायदेशीर आहे त्याला जर हात लागला तर नगररचनाच्या ऑफिसवर जेसीबी फिरतील. लोकांच्या भावना काम करतांना लक्षात घ्या. भारताच्या कायद्या प्रमाणे काम चालले पाहिजे.

नगररचनाकार श्री.पाटील :- सर्व्हेक्षणातील उणीवा दूर करण्याचा प्रयत्न करण्यांत येईल. मा.न्यायालयाने अटी घालून दिले त्याचे पालन करणे आवश्यक आहे. सर्व्हेक्षणातील त्रूटी उणीवा दूर करण्याचा निश्चीत प्रयत्न करु.

मा.श्री.अभय आगरकर :- प्रभाग अधिका-यांना नियुक्त करा. त्यांना संबंधित मंदिराची यादी काढायला सांगा व त्यांच्याशी संपर्क करायला सांगा.

नगररचनाकार श्री. पाटील :- कालपासुन प्रभाग अधिकारी व नगररचना विभागाकडील कर्मचा-या मार्फत रॅपीड सर्व्हेचे काम सुरु केले आहे.

मा.श्री.सचिन जाधव :- सुप्रीम कोर्टाचे निर्देशा प्रमाणे कार्यवाही करा.

नगररचनाकार श्री.पाटील :- नोटीस दिल्याशिवाय कुठलीच कारवाई करता येणार नाही. सन्माननीय सदस्यांना विश्वासात घेवून निर्णय घेवू.

मा.श्री.अभय आगरकर :- माळीवाडयातील मंदिराची शेडयुल १ मध्ये नावे आहे. खंडोबा मंदिर, शनि मंदिर याची नावे आली दुर्देवी आहे.

मा.श्री.कुमार वाकळे :- सर्व्हेक्षण कोणी केला त्यांना स्टेजवर बोलवा.

नगररचनाकार श्री. पाटील :- माहिती मागवून घेतो.

मा.श्री.अभय आगरकर :- जोपर्यंत ६ मंदिरांना नोटीस दिल्या का नाही. याची खात्री होत नाही तोपर्यंत कारवाई स्थगीत करा. हेअरिंगची संधी द्या.

मा.श्री.कुमार वाकळे :- १०० वर्षा पुर्वीची मंदिरे घेतली. नविन मंदिर सोडले त्यामुळै गैरसमज निर्माण झाले आहेत.

मा.श्री.सचिन जाधव :- सुप्रीम कोर्टाचे आदेशावर शासनाने GR काढला दिनांक १९/११/२०१६ चे पत्र वाचुन दाखवला. आपल्याकडे पत्र आहे.

मा.आयुक्त श्री.गावडे साहेब :- सर्व सभागृहाचे निदर्शनास आणू इच्छितो सन २०१० मध्ये सर्वोच्च न्यायालयामध्ये एक पिटीशन दाखल झाले होते. मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल जनहीत याचिका क्रमांक १०४/२०१० मध्ये मा.उच्च न्यायालयाने अनधिकृत धार्मिक स्थळाबाबत काही गाईड लाईन दिल्या. नंतर हायकोर्टामध्ये पुन्हा एक रिट पिटीशन दाखल झाले. त्यानुसार वेळोवेळी शासन निर्णय निर्गमित झाले आहेत. दिनांक २९ सप्टेंबर २००९ नंतरची जी अनधिकृत धार्मिक स्थळे आहेत त्या धार्मिक स्थळावर दिनांक ३१/१२/२०१६ पुर्वी निष्काशनाची कारवाई पूर्ण करावयाची आहे.

त्यानुसार दिनांक २९ ऑक्टोबर २०१६ व ०५ नोव्हेंबर २०१६ चे परिपत्रक शासनाने काढले आहे. दिनांक २९ सप्टेंबर २००९ पुर्वीच्या धार्मिक स्थळांच्या बाबतीत ०५ नोव्हेंबर २०११ चा शासन निर्णय काढण्यात आला आहे. तीन कॅटेगरी मध्ये वर्गिकरण करण्यांत आले आहे. त्यामध्ये जे

अ) डी.सी.रुल्स नुसार नियमित होवू शकतात.

ब) डेव्हलपमेंट प्लॅन व बिल्डींग कन्स्ट्रक्शन रुल्स अनुषंगाने नियमित होवू शकत नसेल तर दिनांक २९ सप्टेंबर २००९ पुर्वीची स्थळे दिनांक १७ नोव्हेंबर २०१६ पर्यंत काढण्याचे स्पष्ट निर्देश आहेत. २९ सप्टेंबर २००९ नंतरची ३१ डिसेंबर २०१६ पुर्वी निष्काशीत करणे आवश्यक आहे. २००९ पर्यंत नियमितीकरण व स्थलांतरीत करणे आवश्यक आहे.

एखादे धार्मिक स्थळ प्रायव्हेट प्रॉपर्टी असेल संबंधिताने स्थलांतरीत करण्याचा प्रस्ताव दिला तर स्थलांतरणासाठी परवानगी देण्याची तरतुद आहे. यासाठी दिनांक ३१ डिसेंबर २०१६ पर्यंत मुदत आहे. २९ सप्टेंबर २००९ पुर्वीच्या धार्मिक स्थळांना जानेवारी २०१७ मध्ये कारवाई सुरु होईल.

क) क कॅटेगरी मध्ये राज्य स्तरीय समितीच्या मान्यतेने सन १९६० पुर्वीची धार्मिक स्थळे निष्काशीत करणे अभिप्रेत आहे. सन १९६० ते २००९ पर्यंतची रस्त्यावरील व पदपथावरील धार्मिक स्थळांवर दिनांक १७ नोव्हेंबर २०१७ पर्यंत कारवाई करण्याचे निर्देश आहेत.

अशा प्रकारचा ५ मे २०१६ रोजीचा स्पष्ट शासन निर्णय आहे. त्याप्रमाणे गृह विभागाने दिलेल्या मुदती पाळण्याचा आपला प्रयत्न आहे. सर्व्हे एक वर्षापूर्वी झाला होता. पूर्वी फेर सर्व्हेक्षणाची ५ मे २०११ च्या GR मध्ये तरतूद होती. प्राथमिक सर्व्हे वृत्त पत्रात प्रसिध्द करण्याची तरतुद होती, आपले जे वृत्तपत्राचे रोटेशन होते त्याप्रमाणे त्या वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यांत आले आहे.

वृत्तपत्रात स्पष्ट केले होते की, एक महिन्यात माहिती सादर केली तर यादीत दुरुस्ती करता येईल. परंतु त्यास फार अल्प प्रतिसाद मिळाला. त्यामुळे यादी ही दुरुस्त होवू शकली नाही.

आपल्या हाताशी जी माहिती उपलब्ध आहे त्यानुसार कारवाई सुरु आहे. उणीवा, त्रूटी दूर करण्यासाठी १७ च्या मिटींगमध्ये क्वीक सर्व्हे करण्याचे, पुराव्याच्या दृष्टीने कागदपत्र मिळाली तर २००९ पूर्वीचे व नंतरचे कोणते हे ठरविण्याचा प्रयत्न त्या दृष्टीने सुरु आहे. आपल्या शहराचा नियोजनबध्द विकासासाठी रस्त्यात असलेल्या धार्मिक स्थळांच्या बाबत मा.हायकोर्टाने जे निर्देश दिले त्यानुसार आपण कार्यवाही करु.

मा.श्री.दिप चव्हाण :- ५७४ नुसार अ,ब व क मध्ये किती आले. १७ तारखेला कोणत्या लोकप्रतीनिधी बरोबर चर्चा झाली.

नगररचनाकार श्री.पाटील :- वर्गीकरणा बाबत कारवाई सुरु आहे. **२३ तारखेच्या मिटींगमध्ये** उपलब्ध पुराव्याच्या आधारे वर्गीकरण निश्चीत करण्याचे काम सुरु आहे. दिनांक १९ सप्टेंबर २००९ नंतरची आकडे पूर्ण झाले आहे.

मा.श्री.दिप चव्हाण :- नगरसेवकांच्या सुचनेनुसार कारवाई केली तर अडचणी येणार नाही. सर्वांना विश्वासात घेवून सर्वांना आवाहन करा.

नगररचनाकार श्री.पाटील :- तशी विनंती मा.आयुक्तांनी केली आहे. वेळोवेळी केलेल्या कारवाईच्या वृत्तपत्रात प्रसिध्द केले. --------- आहे. आमदार साहेब उपस्थीत होते. जी धार्मिक स्थळे सुटलेली आहे. त्यांचाही समावेश करणे बाबत पदाधिकारी यांनी सुचविले. यादी अपडेट करणेबाबत जे काही चुकून आले असतील याबाबत सुचना केली आहे.

मा.सौ.नलवडे :- प्र.क्र. मधील गजानन महाराजांचे मंदिराचे फेर सर्व्हेक्षणा बाबत काल पत्र दिले आहे. नागरिकांचे समवेत फेर सर्व्हेक्षण करण्यात यावे.

मा.श्री.संपत बारस्कर :-फेर सर्व्हेक्षण करा पुरावे उपलब्ध करुन देणार आहेत.

मा.उपमहापौर श्री.श्रीकांत छिंदम :- मी मिटींगला होतो. त्यामध्ये २६ धार्मिक स्थळे काढले ते पाडायचे तुम्ही जे सर्व्हेक्षण केले ते चुकीचे आहे. सर्व्हेक्षणा मध्ये २००९ नंतरची दाखविली आहे. त्यामुळे पुन्हा सर्व्हेक्षण करा. जी मंदिर २००९ पूर्वीची असतील त्यांचे पुरावे पाहुन घ्या व पुरावे असतील तर ते वगळून टाका त्या दिवशी घडलेली चर्चा मकी सांगीतली.

मा.श्री.गणेश भोसले :- आपल्याला टाईम लिमीट दिले का ? तेवढया वेळेत हे होणार का ?

उपमहापौर श्री.श्रीपाद छिंदम :- मिटींगमध्ये त्यांनी मान्य केले आहे. महानगरपालिकेच्या कर्मचा-यांनी सर्व्हे केला त्यात उणीवा आहेत.

मा.श्रीमती.नसीम शेख :- धार्मिक स्थळाची एखादी वीट जरी पाडली तर याठिकाणी दंगली होतील याची जाणीव ठेवून कार्यवाही करा.

मा.श्री.अभिषेक कळमकर :- जे परिपत्रक महाराष्ट्र शासनाने काढले ते इंग्लीशमध्ये आहे. B पॉईंट वाचून दाखविला. याची अंमलबजावणी केली नाही तर याची जबाबदारी मा.आयुक्त, मा.जिल्हाधिकारी व पोलिस अधिक्षक यांचेवर निश्चित केली जाणार आहे.
I पॉईंट मध्ये आपण पोलीस प्रोटेक्शन घेणार आहे. यामध्ये कोणी अडचणी निर्माण केल्या तर क्रीमीनल लॉ नुसार कारवाई होणार आहे. B ॲण्ड C कॅटेगरी मध्ये २९ सप्टेंबर २००९ नंतरच्या धार्मिक स्थळावर कारवाई करणे व त्या आधीच्या मंदिरांसाठी दिनांक १७ नोव्हेंबर २०१७ ची मुदत दिली आहे.

सर्व्हे बाबत प्रभाग अधिकारी यांनी संबंधीत नगरसेवकाला कळवायला पाहिजे. स्पीडने कारवाई चालू केली आहे. मा.हायकोर्टाचे आदेशानुसार या अतिक्रमणामुळे नागरिकांचा श्वास कोंडलेला आहे. तो मोकळा होणार आहे. आपण सडेतोड या ठिकाणी उत्तर देत नाही.

उपायुक्त (सा) श्री.चारठाणकर :- हा विषय अत्यंत संवेदनशील आहे. दिनांक १६ व १७ नोव्हेंबर रोजी २ बैठका महानगरपालिकेमध्ये संपन्न झाल्या. एका बैठकीला मा.पदाधिकारी उपलब्ध होते व दुसरी बैठक महानगरपालिका स्तरीय समितीची झाली. मुळात याबद्दलचा आक्षेप सर्व्हेक्षणाचा आपण उपस्थीत करीत आहात. मा.हाय कोर्टाचे आदेश महानगरपालिका क्षेत्रातील २००९ नंतरच्या धार्मिक स्थळांना संरक्षण नाही याकरीता २००९ नंतरचे आहे किंवा कसे याबाबत काल निवेदन दिले कारवाईची वेळ येते त्यावेळी पुढे येतात. तुमच्याकडे जर पुरावे असतील तर ते आपण सादर करावेत. ३० नोव्हेंबर पर्यंत यादी मा.उच्च न्यायालयाला माहिती द्यावयाची आहे. प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहोचने शक्य नाही. पुरेसा प्रतिसाद मिळत नव्हता. ३० डिसेंबर २०१६ ला आम्ही जी यादी सांगू त्यावर कारवाई करणे आम्हाला बंधनकारक आहे.

नगर शहरात ३ धार्मिक स्थळांना बांधकाम परवानगी आहे. ५७१ ला परवानगी नाही वारंवार आवाहन करुन नागरिक पुरावे देत नाही. परवानगी घेतलेली नसते. १९६० पूर्वीच्या धार्मिक स्थळांचे रेग्युलरायझेशन करणेची तरतूद आहे. ३० नोव्हेंबर २०१६ पर्यंत आम्हाला यादी फायनल करायची आहे. प्रभाग अधिकारी यांना रॅपीड सर्व्हे करण्याचे आदेश दिले आहे. तुमच्या कडील पुरावे द्या. तुमच्याकडचे पुरावे असल्याशिवाय रेग्युलराईज होवू शकत नाही.

मा.श्री.गणेश भोसले :- सर्व सदस्यांनी लवकरात लवकर सर्व पुरावे द्यावे २५ तारखेपर्यंत मुदत द्यावी त्यामध्ये नागरिकांची चूक आहे. नोटीस लावल्यानंतर फोटो काढायला पाहीजे होते.

मा.सौ.रुपाली वारे :- कोणते पुरावे या करीता लागतील.

मा.श्री.सचिन जाधव :- जे मंदिर अनधिकृत असतील ते अधिकृत करण्याची तरतुद नगररचना ॲक्ट मध्ये महानगरपालिकेने सर्व्हे करुन त्या मंदिराला अधिकृत करण्यासाठी आपण नियमात बसून अधिकृत करण्याची कारवाई करावी.

मा.आयुक्त श्री.गावडे साहेब :- मा.स्थायी समिती चेअरमन यांनी उल्लेख केला सर्व्हेची आकडेवारी ५७४ पैकी पुराव्यानुसार आकडेवारी कमी जास्त होवू शकते. ५७४ पैकी ३०० मंदिर खाजगी जागेवर आहेत. डी.पी. रुल्सच्या चौकटीत नियमानुसार बसले तर नियमीत होवू शकतात.

पब्लीक प्रॉपर्टीवरचे नियमितीकरण शक्य होत नाही. दिनांक २९ सप्टेंबर २००९ पुर्वीच्या धार्मिक स्थळांबाबत दिनांक ३१ डिसेंबर २०१६ पर्यंत निष्काशन करावयाची मुदत पाळावी लागणार आहे. आम्ही जुन मध्ये सरकारी / निमसरकारी कागदपत्राची पुराव्यासाठी यादी दिली आहे. त्या नुसार कागदपत्र दिली तर त्याचा विचार होवू शकतो.

मा.श्री.बाबासाहेब वाकळे :- १० % बांधकाम ओपन स्पेसवर देता येते.

मा.आयुक्त श्री.गावडे साहेब :- ओपन प्लॉट व डी.पी.रस्त्यावरील बांधकामे पाडून आपणाला कारवाई करावी लागणार आहे. यापूर्वी वर्तमानपत्रात वेळोवेळी यादी जाहीर केली आहे. माझ्या सहका-यांशी चर्चा करुन २५ पर्यंत मुदत देतो सर्व जाती धर्म पंथ यांना विनंती आपण सर्व पुराव्यानिशी आलात तर वर्गिकरण करतांना विचार करता येईल. आपण मतदार संघातील नागरिकांना माहिती द्यावी आम्ही अंधारात काही करणार नाही. लपुन छपुन काही करणार नाही.

मा.श्री.अभिषेक कळमकर :- प्रसिध्दी विभागाकडून कळवा वर्तमानपत्रत मराठी भाषेत प्रसिध्द करा.

मा.श्री.गणेश भोसले :- फिरते शौचालयाला दिवाळीचे दिवसात आग लागली. अग्निशमन विभागापासून आकेच्या अंतरावर आहे तरी आपण आग विझवू शकलो नाही. अग्निशमन विभागाकडे माणस नाही, फुलफील नाही. या बाबत वारंवार मी मांडले आहे. दुसरा विषय अग्नीशमन विभाग प्रमुख यांनी दिनांक २२/२/२०१६ ला पत्र दिले. साधनसामुग्री कमी आहे. एखादी जर दुर्घटना घडली तर मी त्याला जबाबदार राहणार नाही. वारंवार ते प्रशासनास असे कळवितात. होस पाईप खराब, पाईप लिकेज, गाडी नादुरुस्त आहे. एखादी मोठी दुर्घटना जर झाली तर काय करणार. ५ हजाराचे बील तुम्ही काढीत नाही. यात जर कोणी दगावले तर याची जबाबदारी आयुक्त साहेब तुमची राहणार आहे.

मा.श्री.अभय आगरकर :- प्रत्येक ५० हजार जोकसंख्येला एक फायर स्टेशन पाहीजे असे कायदा सांगतो आपल्याकडे ३ फायर स्टेशन आहे. याबाबत कृती आराखडा करुन विषय संपविला पाहीजे. फायर स्टेशन कडे कार्यरत असलेल्या कर्मचा-याची नियमित ड्रील सुध्दा होत नाही. त्यांचा फिजीकल फिटनेस तपासला गेला पाहीजे, असे येथे होत नाही. यासंदर्भात विषय गंभीरता पूर्वक घ्या.

मा.श्री.गणेश भोसले :- एम.एच.१६ डी.१४१ ४३ दिवस बंद खर्च ९५० येत होता.

मा.श्री.सुनिल कोतकर :- केडगांव येथील अग्नीशमन केंद्रासाठी एकपण गाडी नाही. मोतीनगर मध्ये एक दुर्घटना घडली ओपन फ्लॅटमध्ये आग लागली शेजारच्या घरामध्ये बेड व एसी जळाला आहे. सदर ठिकाणी शिक्षक कुटुंब रहाते ते बाहेरगावी होते. शेजा-यांनी जर पाहीले नसते व घरामध्ये जर एखादा मुलगा असता व दुर्घटना घडली असती तर जी घटना घडली त्याला कोण जबाबदार असते. केडगांव येथील वर्षापूर्वी अग्निशमन केंद्राचे उद्घाटन झाले. कर्मचारी कोणीही उपस्थीत नसतात. आग विझल्यानंतर आपली गाडी तेथे पोहोचते.

मा.श्री.अभिषेक कळमकर :- सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची ठरते भोसले साहेबांनी सांगीतले जे पत्र अग्नीशमन विभाग प्रमुख यांनी दिले त्यांचेकडे जर साहित्य नसेल तर कार्यवाही कशी करणार यापुढे एखादी घटना जर घडली तर यासाठी महापौर व आयुक्त जबाबदार राहतील. ड्रायव्हर या ठिकाणी उपलब्ध नाही. तहसील कार्यालयासमोर एखादे दिवस गाडी उपस्थित असते. याकडे कोणाचे लक्ष नसते. गांभीर्याने लक्ष द्या. त्यांचे काही प्रश्न जाणून घ्या. निश्चीत प्रकारे आउटपुट काढा.

मा.श्री.सचिन जाधव :- जे कर्मचारी कमी पडतात ते मानधनावर घेणे बाबत आम्ही वेळोवेळी सांगीतले लवकरात लवकर २-३ दिवसात याबाबत कारवाई करावी.

मा.श्री.गणेश भोसले :- एवढया जवळ केंद्र असुनही ते आग का विझवू शकलो नाही याबाबत खुलासा करावा.

अग्निशमन विभाग प्रमुख श्री. मिसाळ :- दिनांक २५/१०/२०१६ ला जी आग बेग पटांगण मध्ये लागली १ गाडी फाटाका स्टॅाल जवळ होती. कचरा डेपोला आग लागल्यामुळे १ गाडी तेथे गेली होती. सूचना मिळाल्यानंतर तात्काळ फटाका स्टॅालवरुन गाडी कॅाल करुन आग विझवली. कर्मचारी उपलब्धते मुळे आपण केडगांव साठी गाडी ठेवू शकत नाही.

मा.श्री.सुनिल कोतकर :- २-३ कर्मचारी उपस्थीत असतात. फक्त फोन घेण्याचे काम करतात. गाडी नसते.

अग्निशमन विभाग प्रमुख श्री. मिसाळ :- केडगांवच्या फायर स्टेशनला जर कॅाल लावला तर मुख्यालयाला कॅान्टॅक्ट करण्यासाठी ते कर्मचारी आहेत.

मा.श्री.गणेश भोसले :- प्रशिक्षीत कर्मचारी किती आहे.

अग्नीशमन विभाग प्रमुख श्री.मिसाळ :- १२ कर्मचारी प्रशिक्षीत आहेत.

मा.श्री.सुनिल कोतकर :- मागच्या बैठकीत मानधनावर कर्मचारी घेणे बाबत सूचना दिल्या पण अद्याप का कार्यवाही झाली नाही.

मा.श्री.अभय आगरकर :- या संदर्भात एक मिटींग कॅाल करा. व संबंधीत नगरसेवकाला माहिती द्या.

उपायुक्त श्री.चारठाणकर :- कमी ७ ठिकाणी अग्नीशमन केंद्र पाहीजेत. सध्या ३ केंद्र आहे. शहर, सावेडी व केडगांव उपकेंद्र आहे. होम टेंडर आहे. वॅाटर टेंडर - १ आहे. जीप मिनीटेंडर २ आहेत. छोटी आग विझविण्यासाठी २ बुलेट आहेत. तुलनेने ते कमी आहेत.

६.५० कोटी रुपयांची मागणी आम्ही केली. सभागृहाच्या भावना लक्षात घेता आणखी ४ केंद्रासाठी मुख्य अग्नीशमन सल्लागार याचे मार्गदर्शन घेण्यांत येईल.

उपायुक्त श्री.चारठाणकर :- माजी सैनिकांच्या मुलाखती यासाठी घेतल्या होत्या. स्थायी समिती मध्ये चर्चेनुसार प्रस्ताव मागविले माजी सैनिकांचा रिस्पॅान्स मिळाला. ५६ माजी सैनिकांच्या मुलाखती मी घेतल्या. शासनाने आउट सोर्सींग करण्याचे दिलेल्या आदेशानुसार आपण कारवाई सुरु केली. अग्नीशमन विभागासाठी मानधनावर नेमणूकी बाबत महासभेने जर निर्देश दिले तर त्यानुसार कारवाई करता येईल.

मा.श्री.सचिन जाधव :- याच विभागासाठी अट्टाहास का ?

मा.श्री.अभिषेक कळमकर :- एकाच वेळेस २-३ असा एकाच वेळेस लागल्या तर काय करणार तुम्हाला यामध्ये गांभीर्यतेने घ्या.

मा.श्री.गणेश भोसले :- मा.महापौर यांना आदेश द्या. कर्मचारी भरायला सांगा. कायदेशीर रित्या काय असेल ते करुन घ्यायला सांगा.

मा.श्री.दिप चव्हाण :- बाहेर एक शिष्ठ मंडह आले होते. नेहरुमार्केट संदर्भात निवेदन दिले आहे. २०१० ला स्वतःच्या पैशाने बांधावा असा ठराव झाला ४५१ खाली रद्द झालेले नाही. नगरविकास सचिव यांनी अहवाल सादर करणे बाबत पत्र आहे. शाकीर शेख, संजय झिंजे यांची भावना सभागृहासमोर मांडली.

संस्थेच्या हिताच्या दृष्टीकोनातून त्यांची मागणी व आपली मागणी, कायदेशीर तरतुदी संदर्भात चर्चा झाली या संदर्भात योग्य निर्णयाबाबत याठिकाणी सांगीतले तर बर होईल. सर्व सदस्यांच्या भावना विचारात घेवून आपण सांगावे.

मा.श्री.कैलास गिरवले :- गेल्या अनेक वर्षापासून प्रश्न रेंगाळलेला आहे. अनेक वेळा याबाबत चर्चा झाली महानगरपालिकेने स्वतः बांधकाम करावयाचे डिपॉझिट म्हणून चांगली रक्कम आपणाला मिळू शकते. पण तसे झाले नाही. दोन दिवसापूर्वी मा.दत्ता कावरे यांनी नवि सचिव यांना निवेदन दिले त्या निवेदनात स्पष्ट आहे की, एका नगरसेवकाच्या घशात घालण्यासाठी हा उद्योग चालू आहे. तसे याबाबत कावरे यांनी खुलासा करावा. आमची मानहानी होत आहे. गंभीर स्वरुपाचा आरोप तुम्ही केला.

मा.श्री.दत्ता कावरे :- योग्य वेळ आल्यावर सांगू. मी पणास जबाबदार नगरसेवक आहे. जबाबदारीने आरोप केला आहे.

मा.श्री.अभय आगरकर :- सभेतील पहिले २ विषय नॉमिनल आहेत.

मा.श्री.कैलास गिरवले :- मा.महापौर यांना विनंती अपणाला जर नाव माहित असेल तर खुलासा करावा.

मा.श्री.अनिल शिंदे :- १७-१८ या विषयावर चर्चा करुन ही सभा संपवू. दुस-या सभेत बोलण्याची संधी आपण देणार आहोत.

ज्यु.इंजिनियर श्री.मेहेत्रे :- नेहरुमार्केट बाबत निविदा कॉल केली होती पण निविदा ओपन केली नाही. कोर्टात दाखल केस असल्यामुळे निविदा ओपन केल्या नाही. कोर्टाने आदेश दिले तर निविदा उघडण्यांत येईल.

विषय क्रमांक १७ चे वाचन

मंजूर.

विषय क्रमांक १८ चे वाचन

ज्यु.इंजिनियर श्री.मेहेत्रे :- स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत अहमदनगर महानगरपालिकेस एकुण हप्ता रक्कम रु. ३१२.७६ लक्ष अनुदान प्राप्त झाले आहे. वैयक्तीक शौचालयाकरीता एकूण प्राप्त अर्जांची संख्या ४०९७ आहे. सद्यस्थितीत पहिल्या हप्त्याची एकुण २५३२ लाभार्थी बँक खात्यामध्ये रक्कम रुपये ६००० जमा करण्यांत आली आहे. दुस-या हप्त्यापोटी एकुण ३२३ लाभार्थ्यांना रुपये ६००० प्रमाणे लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्यांत आले आहेत. दुस-या हप्त्याबाबत दिनांक ०३/११/२०१६ रोजीच्या शहर स्तरीय समितीमध्ये दुसरा अनुदानाचा हप्ता वितरीत करणे बाबत एकुण ५४३ प्रकरणे मंजूर करण्यांत आली आहेत. वैयक्तीक शौचालय बांधकाम पूर्ण केलेल्या लाभार्थ्यांची संख्या १४६८ आहे. अद्यापपर्यंत बांधकाम चालू न केलेल्या लाभार्थ्यांची संख्या ४५६ आहे.

मा.श्री.बाबासाहेब वाकळे :- सार्वजनिक शौचालय कोठे उभारणार ?

ज्यु.इंजिनियर श्री.मेहेत्रे :- ५ कुटुंबामागे एक शौचालय ज्याठिकाणी अर्ज नामंजूर केले त्या ठिकाणी.

मा.श्री.योगीराज गाडे :- ज्यांनी अद्याप बांधकाम केले नाही त्यांच्यावर कारवाई केंव्हा करणार.

ज्यु.इंजिनियर श्री.मेहेत्रे :- ३१ मार्च २०१७ पर्यंत कारवाई करावयाची आहे. अद्यापपर्यंत बांधकाम चालू न केलेल्या लाभार्थ्यांची संख्या ४५६ आहे.

मा.श्री.दिप चव्हाण :- ४५६ लोकांवर गुन्हे दाखल करता, बँकेला पत्र देण्यापूर्वी लाभार्थ्यांना पत्र द्यायचे होते. तुम्ही त्यांना संधी द्या.

ज्यु.इंजिनियर श्री.मेहेत्रे :- आपण त्यांना २-३ वेळेस नोटीस दिल्या पण अद्याप बांधकाम सुरु केलेले नाही. प्रकरण मंजूर करतांना आदेशामध्ये फौजदारी कारवाईचा उल्लेख केला आहे.

मा.श्री.दिप चव्हाण :- सर्व्हे परिपूर्ण करत नाही. वॉर्ड इन्स्पेक्टर सर्व्हे करतात.

ज्यु.इंजिनियर श्री.मेहेत्रे :- कंपनीचे लोक सर्व्हे करतात. ८ इंजिनियर व ८ एस.आय.च्या टीमने सर्व्हे केला आहे.

मा.श्री.दिप चव्हाण :- त्या लोकांना परत एकदा नोटीस द्या एक महिन्याची मुदत द्या. नोटीस मध्ये नाईलाजास्तव फौजदारी कारवाई करावी लागेल असा उल्लेख करा.

मा.श्री.अभय आगरकर :-मा.शासनाने चांगली योजना आणली योजना यशस्वी होण्यासाठी आपण प्रयत्न केले आहेत. महानगरपालिकेच्या वतीने प्रसिध्द करा. आठवडयाच्या मुदतीत कारवाई केली नाही तर फौजदारी कारवाई करण्यात यावी.

मा.श्री.अभिषेक कळमकर :- २०० कंटेनर साठी ठराव केला होता. त्याबाबत काय झाले.

ज्यु.इंजिनियर श्री.मेहेत्रे :- महासभेकडे प्रस्ताव पुढच्या महासभे समोर येणार आहे.

मा.श्री.संपत बारस्कर :- मागच्या सभेनंतर नगर शहरातील खड्यांची आपण पाहणी केली आपण १५ दिवसानंतर शहर व उपनगरातील खड्डे पॅचींग करु असे सांगीतले. किती उपनगरातील खड्डे पॅचींग झाले याबाबतची माहिती द्यावी.

शहर अभियंता श्री.सोनटक्के :- खड्याचे जे काम पत्रकार चौक, अप्पू चौक, दिल्लीगेट, अमरधाम ते माळीवाडा काम केले आहे. भिस्तबाग, कुष्ठधाम पाईप लाईन रस्ता, शिला विहार चौक, गणपती मार्ग, मोहरम मार्ग केला.

मा.श्री.संपत बारस्कर :- पॅचींग केली का मेन डी.पी. रोड वरचे रस्ते बुजविले नाही.

मा.श्री.बाबासाहेब वाकळे :- सावेडी नाक्याने रस्त्यावरुन फिरुन पहा.

मा.श्री.संपत बारस्कर :- सावेडी नाका ते पाईप लाईन रस्ता आज मटेरियल पडणार आहे आम्ही पत्र देवून किती दिवस झाले. मा.महासभेत गोंधळ

मा.श्री.स्वप्नील शिंदे :- पॅचींगची पध्दत आम्ही सोनटक्के साहेबांना विचारली त्यांनी सांगीतले चौकोनी खड्डा घेतो व इतर माहिती दिली. मा.आयुक्त साहेब त्या ठिकाणी आले तूम्ही ज्या पध्दतीने सांगता त्या पध्दतीने पॅचींग होत नव्हते आम्ही आयुक्तांना विचारले आपण याच्यावर ॲक्शन का घेतली.

मा.श्री.संपत बारस्कर :- इतक्या दिवसात खड्डे का बुजविले नाही. याबाबत यादीसह पत्र दिले. वॉर्डातील नागरीक आम्हाला विचारतात. वारंवार आंदोलनाची वेळ येवू देवू नका.

मा.श्री.स्वप्नील शिंदे :- ४० कोटीमध्ये ७०% कामे रस्त्याची आहे आयुक्तांना भेटून सांगीतले पावसाळा संपलेला आहे. कॉन्ट्रॅक्टर अद्याप काम सुरु करीत नाही.

शहर अभियंता श्री.सोनटक्के :- संबंधित ठेकेदार यांची मा.आयुक्त व मा.महापौर यांचेकडे बैठक घेतली. १४० कामापैकी ९८ रस्त्याचे ------------ ४७ काम प्रगतीत आहे. ------ केडगांवचे काही काम प्रगतीत आहे.

मा.श्री.स्वप्नील शिंदे :- किती

शहर अभियंता श्री.सोनटक्के :- १४० कामा पैकी १२५ कामाच्या वर्क ऑर्डर झाल्या. वर्कऑर्डर होवून ४ १/२ महिने झाले ज्या रस्त्यांना वर्क ऑर्ड दिली त्या रस्त्यावर पॅचींग करीत नाही.

मा.श्री.स्वप्नील शिंदे :- कोण ठेकेदार आहे.

शहर अभियंता श्री.सोनटक्के :- मे सी कोठारी

मा.श्री.स्वप्नील शिंदे :- अद्यापही काम करायला तयार होत नाही. सदर कॉन्ट्रॅक्टरला काळया दीत का टाकत नाही. आम्ही रस्ता आयुक्तां समोर खोदून दाखविला.

मा.महापौर साहेब :- पावसाळा असल्याने पॅचींगचे काम करता आले नाही. आता काम सुरु आहे.

शहर अभियंता श्री.सोनटक्के :- जे काही खड्डा भरला होता पण तोच रस्ता उघडू नये म्हणून मोठा स्प्रेड केला सिध्दीबागे जवळ खडी टाकून ग्राउटींग करुन, पॅचींग करण्यात आले.

मा.महापौर साहेब :- आता सोनटक्के यांनी पॅचींग बाबत लक्ष देवून काम करुन घ्यावे.

मा.श्री.विजय गव्हाळे :- विषय क्रमांक १७,१८ मंजूर आचार संहिता असल्याने १९ ते २२ स्थगीत ठेवण्यांत यावेत.

प्रति,
पोलीस निरीक्षक,
तोफखाना पोलिस स्टेशन,
अहमदनगर.

विषय : शनिवार दिनांक १९/११/२०१६ रोजी सकाळी ११.०० वा व शनिवार दिनांक १९/११/२०१६ रोजी दुपारी १.०० वा होणा-या अहमदनगर महानगरपालिकेच्या मा.सर्वसाधारण व खास सभेसाठी पोलीस बंदोबस्त मिळणे बाबत...

महोदय,

उपरोक्त विषयानुसार कळविण्यांत येते की, शनिवार दिनांक १९/११/२०१६ रोजी सकाळी ११.०० वा व शनिवार दिनांक १९/११/२०१६ रोजी दुपारी १.०० वाजता अहमदनगर महानगरपालिकेची मा.सर्वसाधारण सभा व खास सभा **नविन प्रशासकीय इमारत, अहमदनगर महानगरपालिकेचे सभागृह, अहमदनगर** येथे होणार आहे.

तरी सदर दिवशी कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीकोनातुन अहमदनगर महानगरपालिका सभागृहास पुरेसा पोलीस बंदोबस्त मिळणे बाबत विनंती आहे.

सहाय्यक आयुक्त,
अहमदनगर महानगरपालिका.

प्रत : मा.महापौर साहेब, अहमदनगर महानगरपालिका, यांचेकडेस माहितीस सादर.

प्रत : मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका, यांचेकडेस माहितीस सादर.

प्रत : मा.पोलीस अधिक्षक, पोलिस अधिक्षक कार्यालय, अहमदनगर, यांचेकडेस माहितीस सादर.

जा.क्र.नगरसचिव/AMC.-
दिनांक :       /११/२०१६.

संबंधीत खाते प्रमुख व शाखा प्रमुख,
अहमदनगर महानगरपालिका,
अहमदनगर.

यांस.-

कळविण्यात येते की, अहमदनगर महानगरपालिकेची मा.सर्वसाधारण सभा व खास सभा शनिवार दिनांक १९/११/२०१६ रोजी सकाळी ११.०० वा व शनिवार दिनांक १९/११/२०१६ रोजी दुपारी १.०० वाजता **नविन प्रशासकीय इमारत, अहमदनगर महानगरपालिकेचे सभागृह, अहमदनगर** येथे बोलविण्यात आलेली आहे.

तरी आपल्या नावासमोर दर्शविलेल्या कामाची आपण पुर्तता करावी.

सहाय्यक आयुक्त,
अहमदनगर महानगरपालिका.

प्रत :-

| | | | |
|---|---|---|---|
| १) | शहर अभियंता | : | या सभेकरीता स्टेजवरील व्यवस्थेसह हॉलमधील मा.नगरसेवकांच्या संख्येनुसार तसेच विभाग प्रमुख, पत्रकार व नागरिक यांच्या संख्येनुसार सभागृहातील बैठक व्यवस्था पाहुन ज्या सोयी सुविधा सभेसाठी आवश्यक असतील त्या कराव्यात |
| २) | घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख | : | महानगरपालिका सभागृहाचे आसपासचे भागाची साफसफाई करुन घेण्याबाबत संबंधितांस सुचना द्याव्यात. |
| ३) | प्रसिध्दी अधिकारी | : | बैठकीची सुचना व विषयपत्रिका या सोबत जोडली आहे. त्याची जाहिरात स्थानिक वृत्तपत्रात त्वरीत प्रसिध्द करावी व प्रसिध्दीचे २ (दोन) अंक इकडेस पाठवावेत. |
| ४) | इलेक्ट्रीक सुपरवायझर | : | वरीलप्रमाणे नोंद घेवून महानगरपालिका सभागृहातील सभेकरीता लाईट व लाऊड स्पीकरची व्यवस्था करण्यात यावी. तसेच नेहमीप्रमाणे टेपरेकॉर्डची सुध्दा व्यवस्था करण्यात यावी. |
| ५) | श्री.एल.डी.बनकर, रक्तपेढी विभाग | : | महानगरपालिका सभागृहात सभेपुर्वी उपस्थित राहुन सभेच्या वेळेस विषय वाचन करावे. |
| ६) | श्री.दत्तात्रय ढवळे, स्वीय सहा. आयुक्त कार्यालय, | : | आपण सभेपुर्वी महानगरपालिका सभागृहात उपस्थित राहुन संपुर्ण सभेचे प्रोसिडींग घेण्याचे काम करावे. |
| ७) | श्री.अशोक चेन्नुर, पाणीपुरवठा विभाग | : | महानगरपालिका सभागृहात राष्ट्रगीत म्हणणे करीता सभेपुर्वी उपस्थित रहावे. |
| ८) | मनपा हवालदार | : | वरील प्रमाणे नोंद घेवुन महानगरपालिका सभागृहात आवश्यक ती पुर्तता करावी. |

प्रत : मा.महापौर साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांचेकडेस माहितीस सादर.
प्रत : मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांचेकडेस माहितीस सादर.

कार्यालयीन आदेश.                अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

जा.क्र.नगरसचिव.AMC.-
दिनांक :     / ११ /२०१६.

१) श्री.मच्छिंद्र बेरड, स्थायी समिती कार्यालय,
२) श्री.तांबे, उपमहापौर कार्यालय,
३) श्री.भुतकर, ऑडीट विभाग,
४) श्री.फाळके, नगररचना विभाग,
५) श्री.संतोष कांबळे, घनकचरा विभाग,
६) श्री.शिंदे, कामगार विभाग,
७) श्री.झारखंडे, महिला व बालकल्याण विभाग,
८) श्री. काटकर, सामान्य प्रशासन विभाग,
अहमदनगर महानगरपालिका.

यांस.-

आदेशीत करण्यात येते की, अहमदनगर महानगरपालिकेची मा.सर्वसाधारण सभा व खास सभा शनिवार दिनांक १९/११/२०१६ रोजी सकाळी ११.०० वा व शनिवार दिनांक १९/११/२०१६ रोजी दुपारी १.०० वाजता **नविन प्रशासकीय इमारत, अहमदनगर महानगरपालिकेचे सभागृह, अहमदनगर** येथे होणार आहे.

तरी आपण सकाळी १०.०० वाजता कार्यालयीन गणवेशात हजर रहावे व मनपा हवालदार यांच्या सूचनेनुसार काम पहावे.

प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

प्रत : महानगरपालिका हवालदार, अहमदनगर महानगरपालिका यांस माहितीस व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

जा.क्र.नगरसचिव/AMC.-
दिनांक :        /१०/२०१६.

घनकचरा व्यवस्थापन प्रमुख,
अहमदनगर महानगरपालिका,
अहमदनगर.

**विषय :- दिनांक १९/१०/२०१६ रोजीची मा.सर्वसाधारण सभा.**

आदेशीत करण्यांत येते की, अहमदनगर महानगरपालिकेची मा.सर्वसाधारण सभा बुधवार दिनांक १९/१०/२०१६ रोजी दुपारी १.०० वाजता **नविन प्रशासकीय इमारत, अहमदनगर महानगरपालिकेचे सभागृह, अहमदनगर** येथे बोलविण्यात आलेली आहे. सदर विषयपत्रिकेतील विषय क्रमांक ३९, ५१ आपले विभागाशी निगडीत असल्याने या विषयाची अद्यावत व परिपूर्ण टिपणी त्वरीत मा.आयुक्त व मा.उपायुक्त यांचेकडेस सादर करावी.

तसेच विषय क्रमांक ....... अन्वये मागील सभा क्रमांक २ दिनांक ३१/०८/२०१५ व सभा क्रमांक ३ दिनांक ०९/११/२०१५ रोजीचे इतिवृत्तात नमूद करण्यात आलेल्या बाबींवर लिखीत टिपणी त्या सोबत सादर करण्यात यावी.

तसेच सभेस आपण निर्धारीत वेळेच्या अर्धातास आधी महानगरपालिका मुख्यालयात उपस्थित रहावे. कोणत्याही परिस्थितीत प्रतिनिधी वा माहितगार कर्मचारी आपल्या वतीने अत्यावश्यक असल्याखेरीज मा.आयुक्त तसेच मा.महापौर तथा पिठासीन अधिकारी यांची परवानगी घेतल्याशिवाय गैरहजर राहू नये.

उपायुक्त (सा),
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.
नगरसचिव विभाग -
दिनांक :     /१०/२०१६.

विषय : शनिवार दिनांक १९/११/२०१६ रोजी सकाळी ११.०० वा व शनिवार दिनांक १९/११/२०१६ रोजी दुपारी १.०० वाजता झालेल्या सर्वसाधारण सभा क्रमांक ४ व खास सभा क्रमांक ५ च्या चहापान खर्चास कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत...

सादर,

विनंती रिपोर्ट की, महाराष्ट्र शासनाचे शासन परिपत्रक क्रमांक एम.सी.ओ. ४६८५-१८८२ सी. आर.६८-८६-युडी-१४ दिनांक २९ जुलै १९८६ अन्वये कळविले आहे की, चहा व इतर पदार्थांचे दर बदलत असतात म्हणून चहापानाचे कमाल दर परिपत्रकान्वये ठरवून देण्याची आवश्यकता वाटत नाही. कौन्सीलच्या सांविधीक समितीच्या बैठकीसाठी मनपा/नपा यांनी चहापानाचा खर्च आकस्मिक निधीतून (कॉन्टीजन्सी एक्सपेंन्डीचर) किती करावा हे प्रत्येक नगरपालिकेने ठरवावे त्याप्रमाणे खर्च करावा, अशी तरतूद आहे.

अहमदनगर महानगरपालिका सर्वसाधारण सभा क्र. १ दिनांक १७/०२/२०१२ अन्वये अहमदनगर महानगरपालिका खास सभा/सर्वसाधारण सभेचा चहापान खर्च रक्कम रु. १८,०००/- करणेत आला आहे. अहमदनगर महानगरपालिकेची मा.सर्वसाधारण सभा व खास सभा शनिवार दिनांक १९/११/२०१६ रोजी सकाळी ११.०० वा व शनिवार दिनांक १९/११/२०१६ रोजी दुपारी १.०० वाजता नविन प्रशासकीय इमारत, अहमदनगर महानगरपालिकेचे सभागृह, अहमदनगर येथे झाली आहे.

सदर अहमदनगर महानगरपालिकेच्या सभागृहात आयोजित केलेल्या या सभेस उपस्थित सभासदांचे चहापानाकरीता रक्कम रु.७,३१०/- (अक्षरी रक्कम रुपये सात हजार तीनशे दहा फक्त) च्या झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरी मिळावी, सदरचा खर्च नगरसचिव विभागाच्या *** सभेचे चहा नाष्टा बील *** या लेखाशिर्षाअंतर्गत दर्शविण्याच्या मान्यतेस्तव तसेच सदरचा खर्च श्री.एस.बी.तडवी, प्र.नगरसचिव, अहमदनगर महानगरपालिका यांनी केला असुन सदरचा धनादेश श्री.एस.बी.तडवी, प्र.नगरसचिव यांचे नांवे काढणे बाबत मुख्यलेखाधिकारी यांना आपलेस्तरावरुन आदेश होणेस विनंती आहे.

| | | |
|---|---|---|
| **तरतुद** | : | **४,००,०००/-** |
| **पुर्वीचा खर्च** | : | |
| **हया बीलात दाखविलेला खर्च** | : | |
| **उपलब्ध शिल्लक** | : | |

प्र.नगरसचिव,
नगरसचिव विभाग,
अहमदनगर महानगरपालिका.